संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 2 | Marathi Monthly | Thane, 1 August 2025 to 31 August 2025 | Pages 16 | Price : 10/-

## भाजप-संघीय मराठी-घातकी, लोकशाहीविरोधी व अत्यंत गलिच्छ-धर्मविद्वेषी राजकारणाला 'शह' देण्याच्या अपरिहार्यतेतून 'ठाकरे-परिवार' एकत्र येण्याच्या पार्श्वभूमीवर....

### ...त्यातून ताकद, संबधित मराठी राजकीय पक्षांची जरूर वाढेल; पण, ती ताकद, थेट महाराष्ट्राची व महाराष्ट्रातल्या मराठी-माणसाची वाढेल, असं काही क्रांतिकार्य घडण्यासाठी.....



**५ जुलैच्या ठाकरे बंधूंच्या मेळाव्यातून परतल्यावर मराठी कामगार-कर्मचाऱ्यांच्या मानगुटीवरचं 'कंत्राटी-कामगार पद्धती'चं बसलेलं भूत उतरणार नसेल किंवा त्यांच्या घरात घुसलेली, ही 'कंत्राटी-अवदसा' नाहिशी होण्याची शक्यता खात्रीने निर्माण होणार नसेल... आणि मुंबई, ठाणे, पुणे, रायगडमधील नव्यानं विकसित झालेल्या पनवेलसारख्या शहरांतून; तसेच नाशिक, नागपूरसारख्या शहरं-उपनगरांतून प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे जास्तीतजास्त फक्त ''एक दुकान, एक मकान'' यासारख्या 'संपत्तीचं पुनर्वाटप' करण्याच्या राजकीय-धोरणातून...आपल्याच महाराष्ट्रात 'जगण्याची कोंडी' झालेल्या मराठी-माणसांच्या ताब्यात मराठी शहरं जाणार नसतील व कसबी-होतकरु, उद्यमशील-सुशिक्षित मराठी तरुणतरुणींचे संसार आणि उद्योग-व्यवसाय नव्याने फुलणार नसतील; तर, ''कोण एकत्र आले आणि कोण फुटले''** ...यामुळे, महाराष्ट्राला नेमका काय फरक पडतो? महाराष्ट्रात जागोजागी मोठा 'विकास' होत राहील; पण, त्या विकासात मोजकीच प्रस्थापित मराठी-मंडळी (प्रामुख्याने मराठी-राजकारणी व मराठी-सरकारी अधिकारीवर्ग) 'लाभार्थी' असतील...तो विकास महाराष्ट्राचा नसेल; तर, महाराष्ट्रात वसलेल्या 'गुजराथ'चा असेल! मग, **महाराष्ट्रात मराठी-भाषा अभिजात ठरली काय किंवा हिंदी-गुजराथी-इंग्रजीच्या आक्रमणाने नष्टप्राय झाली काय... काय मोठा फरक पडतो? कारण, तसंही मातृभाषेतूनच जगभर मुलं शिक्षण घेत असताना (जे शिक्षण-तज्ज्ञांच्या मते, अगदी शंभर टक्के योग्यच असतं)...आपल्या महाराष्ट्रात,** ...पृष्ठ क्र. ३ वर

## होय, मुंबई आम्ही ६० कोटी ६६ लाख रुपयात विकत घेतलीय... म्हणून, मुंबई आमच्याच बापाची आहे !!!

**मुंबई नगरी ही पहिल्यापासूनच बहुभाषी असली आणि तिच्या उभारणीत नि जडणघडणीत मराठ्यांसह सर्व प्रांतीयांचा वाटा असला; तरी, तिचे अव्वल भौगोलिक स्थान आणि प्राचीनत्व हे निखळ मराठी आणि मराठीच आहे.**

महाराष्ट्राला गुजरातशी सयामी जुळ्यासारखे जोडून द्वैभाषिक राज्य चालवण्याचा केंद्राचा हेका महाराष्ट्रीयांनी मोडून काढला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण केला. आणि गेली पन्नास वर्षे ' मुंबई कोणाची?' हा प्रश्न सतत ऐरणीवर येत राहिला. ...पृष्ठ क्र. २ वर

## 'मराठीत्व'हेच मूलभूत स्वरुपाचं 'राष्ट्रीयत्व' आहे!

*...राजन राजे*

*आतातरी, महाराष्ट्रातील मराठी-माणसांनी 'मराठीत्व' हेच, एक मूलभूत स्वरुपाचं 'राष्ट्रीयत्व' आहे, हे जाणून घ्यावं...म्हणूनच, 'जय हिंद, जय महाराष्ट्र' नव्हे; तर म्हणायचं, ''जय महाराष्ट्र, जय हिंद''!* ...पृष्ठ क्र. ७ वर

### अंतरंग



वसंतराव पाटील आणि संजय सूर्यवंशी...कामगार-धर्म जोपासणारे 'LG हिंग' कंपनीतील 'धर्मराज्य'चे सच्चे गुणवंत कामगार...!!!

पृष्ठ क्र. ४



गुरुपौर्णिमा

पृष्ठ क्र. ९



अल्गॉरिदम्स आणि गिग-वर्कर्स...

*- निलांबरी जोशी*

पृष्ठ क्र. १०

# गुजराथी भांडवली व्यवस्थेला हादरे दिलेत, तरच मराठी भाषा आणि मराठी माणूस सुरक्षित राहील!

प्राथमिक अभ्यासक्रमात तिसरी भाषा म्हणून, हिंदीभाषा सक्तीचा समावेश जरी, राज्य शासनाने तूर्तास रद्द केला असला तरी, सरकारची ही शासकीय लबाडी असून, **''लबाडी अजून थांबलेली नाही, तर लढाई कशी थांबेल?'' या घोषणेखाली, 'शालेय शिक्षण अभ्यास आणि कृती समन्वय समिती'चे आयोजक प्रा. डॉ. दीपक पवार यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. ७ जुलै–२०२५ रोजी, मुंबईच्या आझाद मैदानात एकदिवसीय धरणे आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनाला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे, पक्षाचे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, कॉंग्रेसचे रोजगार विभाग प्रदेश संयोजक श्री. धनंजय शिंदे आणि ठाण्यातील मराठीप्रेमी वकील श्री. रशिकांत थोरवे आदी मान्यवरांसह, श्री. अविनाश सावंत, श्री. सुमित कदम, श्री. निलेश सावंत हे 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यकर्ते उपस्थित होते.** यावेळी पाचवीपर्यंत कोणतीही तिसरी भाषा नको, डॉ. नरेंद्र जाधव समिती तत्काळ रद्द करण्यात यावी, बालभारतीची शैक्षणिक स्वायत्तता अबाधित ठेवण्यात यावी, शिक्षणमंत्री दादा भुसे आणि SCERT संचालक राहुल रेखावार यांची हकालपट्टी करण्यात यावी, १५ मार्च–२०२४चे नवीन संचमान्यता धोरण रद्द करावे, या मागण्या करण्यात आल्या. याप्रसंगी प्रा. डॉ. दीपक पवार आणि मा. राजन राजे यांच्यात महाराष्ट्रात शिक्षणाचे 'मराठीकारण' व मराठी भाषेच्या संरक्षण–संवर्धन चळवळीसंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली.

**मराठी भाषेचं बाजारपेठेतील महत्त्व घसरत चाललंय... पण, आपल्याला ही बाजारपेठेतील किंमत कशी वाढेल हे पाहणं अत्यंत गरजेचं असून, त्यासाठी भांडवली व्यवस्थेला हादरे द्यावे लागतील. हा प्रश्न फक्त हिंदीभाषिक म्हणून उत्तर–भारतीयांपुरता मर्यादित नाहीये; तर, गुजराती आणि मारवाडी यांच्या भांडवली–व्यवस्थेला हादरा देण्याचा सुद्धा आहे आणि म्हणूनच, अनेक गोष्टींसोबत कंत्राटी–कामगारपद्धतीचं उच्चाटन हे प्रामुख्याने व्हायला पाहिजे.** देशासोबतच, प्रामुख्याने महाराष्ट्रासमोरील हा सगळ्यात मोठा प्रश्न आहे. या गुजराथी–भाषिकांच्या भांडवली व्यवस्थेला हादरे दिलेत, तरच तुमची मराठी भाषा आणि मराठी माणूस सुरक्षित राहील, नाहीतर त्याचं महाराष्ट्रातून उच्चाटन होईल. अनेक आंदोलनं करताना, पर्यावरणीय महासंकटाच्या संदर्भात आम्हाला सांगितलं जातं की, कोण कुठे जन्माला येतो हा अपघात असतो. कोण कोकणात जन्माला येतो तर, कोण आणखी कुठे जन्माला येतो; मग, आमच्या सगळ्यांचा महाराष्ट्रातला जन्मसुद्धा एकदाचा अपघात ठरवा आणि आम्हाला अरबी समुद्रात ढकला...नाहीतरी, आमच्या महापुरुषाचा–महानायकाचा पुतळा तुम्ही अरबी समुद्रात उभारत आहातच. मराठी तरुणतरुणींचे संसार आणि व्यवसाय फुलण्यासाठी (मुं. ठा. पु. रा. ना. म्हणजेच, मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक अन् नागपूर) शहरं मोकळी करुन घ्यावी लागतील.... आपल्याला नजिकच्या भविष्यात प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे फक्त ''एक दुकान–एक मकान'' अशी कडक धोरणं राबवावी लागतील...तरच आणि तरच महाराष्ट्रात मराठी माणसाचा बोलबाला होईल, मराठी भाषेला पुन्हा एकदा कायमस्वरुपी महत्त्व प्राप्त होईल....

***...राजन राजे***

## होय, मुंबई आम्ही ६० कोटी ६६ लाख रुपयात विकत घेतलीय... म्हणून, मुंबई आमच्याच बापाची आहे !!!

...पृष्ठ क्र. १ वरुन

मुंबई फक्त मराठ्यांचीच नव्हे तर सगळ्यांची, इथपासून ते 'मुंबई तुमची, भांडी घासा आमची' म्हणण्यापर्यंत कटुता ताणली जात असते. मुंबई हे दक्षिण आशियाचे इकॉनॉमिक हब होण्यापर्यंतची घोडदौड ही, परप्रांतीयांच्या भांडवलामुळे झाली असे उदाहरणांसकट मांडले जाते. पैसा, भांडवल हे शब्द नुसते ऐकले तरी मराठी माणसाला विनाकारण हुडहुडी भरते. किंबहुना पैसा आणि मराठी हे दोन विरुध्दार्थी शब्द असल्यागत आपली वाटचाल असते. त्यामुळे भांडवलवाल्या अमराठी माणसांसमोर मराठी माणसे कायम न्यूनगंड घेऊन वावरत असतात. रस्त्यावरच्या राड्यांमागेही हाच न्यूनगंड असतो.

पण याच महाराष्ट्राने मुंबईसह स्वतंत्र राज्य म्हणून जन्माला येण्यापोटी गुजरातला चक्क कोट्यवधी रुपये मोजले आहेत, हे फारच कमीजणांच्या गावी असेल. महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन स्वतंत्र राज्ये अस्तित्वात येणार, ही काळ्या दगडावरची रेघ ठरल्यानंतर, राज्यघटनेच्या ७ व्या व ८ व्या परिशिष्टात ...आवश्यक सुधारणा करण्यात आल्या. कलम ४२(२), ४८(१) आणि ५१(५) अनुसार गुजरात राज्याची राजधानी विकसित करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या राज्याच्या कॅश बॅलन्स इन्व्हेस्टमेंट अकाऊंटमधून १० कोटी रुपये इतकी रक्कम देण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले.

त्यानंतर गुजरात राज्याची वार्षिक तूट भरून काढण्यासाठी १९६० साली ६.०२ कोटी रुपयांपासून सुरुवात करून १९६९–७० पर्यंत १.१४ कोटी अशा क्रमाने रकमा द्याव्या....असे ठरले.... याखेरीज १९६२–६३ पासून १९६९–७० पर्यंत ८ आर्थिक वर्षांत गुजरातला २८.३९ कोटी रुपये लाभ व्हावा असाही निर्णय झाला. बॉम्बे रिऑर्गनायझेशन ॲक्ट १९६० च्या कलम ५२खाली महाराष्ट्राने गुजरातला १९६२–६३ साली ६१२ लाख, ६३–६४ साली ५८५ लाख, ६४–६५ साली ५०१ लाख, ६५–६६ साली ५२६ लाख, ६६–६७ साली ४३३ लाख, ६७–६८ साली ३४० लाख, १९६८–६९ साली २०९ लाख असे ३२ कोटी ६६ लाख रुपये दिले....



यात नव्या तरतुदीनुसार दिलेले ३८ कोटी धरून एकूण ६० कोटी ६६ लाख रुपये महाराष्ट्राने गुजरातला दिल्याची नोंद 'द गॅझेट ऑफ इंडिया एक्स्ट्रा ऑर्डिनरी' मध्ये आहे.....

याचा अर्थ......मुंबईवरील ताबा राखण्यासाठी महाराष्ट्राला ६० कोटींची किंमत चुकवावी लागली आहे. .....होय, एका परीने मुंबई आपण विकत घेतलीय.....

.....भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी झालेल्या फाळणीत पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे लागले..... त्यावरून आजही एक वर्ग सतत विखारलेला असतो.... इथे तर स्वतंत्र भारतातीलच एका राज्याने दुसऱ्याला ही किंमत मोजली आहे.....

.... या मुंबईत कामगार... चाकरमानी.... कारकून.. कष्टकरी.... आणि निर्धन बुद्धिवादी इतकीच ओळख... असलेल्या मराठी माणसाला कोणताच न्यूनगंड बाळगण्याची गरज नाही......

....मुंबईसह महाराष्ट्र अस्तित्वात आणण्यासाठी १०६ हुतात्म्यांचे रक्त तर आपण सांडले आहेच.... पण ६० कोटी ६६ लाख रुपयेही मोजले आहेत.....

.... ही महत्वाची माहिती जास्तीतजास्त पसरून आमची मुंबई म्हणणाऱ्यांचे तोंड बंद करा......

.... मुंबई आमची म्हणणाऱ्या गुजराती लोकांनी हा लेख वाचावा... कारण हा लेख मुंबईबाबत महाराष्ट्र आणि गुजरात मधल्या व्यवहाराचा आहे......

पाकिस्तान देश नवीन वसवताना ५५ कोटी दिले ते अखंड भारताने दिले होते, येथे गुजरात राज्य उभारणीसाठी महाराष्ट्र राज्यातील सरकारने ६० कोटी दिले होते हे विसरून गेले

*.... जय महाराष्ट्र....*

होय, मुंबई आम्ही ६० कोटी ६६ लाख रुपयात विकत घेतलीय –

***– प्रतिमा जोशी***

# 'ठाकरे-परिवार' एकत्र येण्याच्या पार्श्वभूमीवर....

...पृष्ठ क्र. १ वरुन

**मराठी-शाळा एकतर भिकेला लावल्या गेल्यात किंवा बिल्डर-राजकारण्यांनी त्या आपल्या घशात घातल्यात (अर्थातच त्यासाठी, महापालिकांमधून सत्ता गाजवणाऱ्या पक्षांचे बिल्डर-राजकारणी प्राधान्याने जबाबदार आहेत)... अशा दुर्दैवाच्या दशावतारात कुठला मराठी-माणूस, मराठी-शाळेत आपल्या पाल्याला पाठवायला धजावेल किंवा पाठवू शकेल? अजून ग्रामीण भागात मराठी-शाळा आपलं अस्तित्व कसंबसं टिकवून आहेत, हे आपलं नशीब...पण, आता तिथेही 'शिक्षणाचा धंदा' मांडणाऱ्या इंग्रजी-माध्यमाच्या शाळा हळूहळू घुसायला लागल्यात.**

लक्षात घ्या की, इंग्रजी-माध्यमातून शिकणारी बहुतेक मराठी मुलं, आता तोडकीमोडकी मराठी बोलतात... त्यांच्या धेडगुजरी भाषेतल्या शब्दाशब्दाला खेटून इंग्रजी-शब्द बाहेर पडत असतात...त्यांची संस्कृती आंग्रजाळलेली असते; महन्मंगल मराठी-संस्कृतिशी त्यांची नाळ तुटलेली असते...मग ती निसर्ग-पर्यावरणस्नेही आहे, 'जगाला प्रेम अर्पावे' अशी निखळ प्रेमळ आहे आणि केवळ, ''जगवा आणि जगू द्या'' असं नव्हे; तर, ''जगा, जगवा आणि जगू द्या'' अशी खऱ्याअर्थाने 'पौर्वात्य-संस्कृति'ची जाज्वल्य मांडणी करणारी आहे...ही, मराठी-संस्कृतीची महानता, त्यांना कुठून कळणार?

शिवसेना आज आहे (ती अर्थातच उद्धवजींचीच निर्विवाद आहे), कालही होती आणि उद्याही असेल...पण, त्या शिवसेनेच्या नजरेसमोरच महाराष्ट्रातला सर्वसामान्य मराठी-माणूस उध्वस्त होत गेला, हे अस्वस्थ करणारं वास्तव नाकारण्याची हिंमत असेल कोणाची? उद्धवजींविषयी, मला व्यक्तिशः ममत्व आहे, आस्था-आदर आहे...मोठा उमदा माणूस आहे, हा सद्गृहस्थ! पण, त्यामुळे महाराष्ट्रातल्या मराठी-माणसांच्या वस्तुस्थितीचे-भविष्याचे काळे रंग बिलकूल बदलत नाहीत. ते काळे रंग उद्धवजी आणि राजसाहेब ठाकरे, एकत्र येऊन व एकत्र राहून बदलू शकत नाहीत का?

...या प्रश्नाच्या उत्तरासंदर्भात, मी इथे कम्युनिस्ट चीन-रशियाचं उदाहरण देत नाहीय; तर, देतोय उदाहरण भांडवलशाहीची 'मक्का-मदिना' असलेल्या अमेरिकेचं! १९३०च्या जागतिक-महामंदीत व त्यानंतर दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या संक्रमण-काळात (१९३३-४५) अमेरिकेत आर्थिक-विषमतेनं टोक गाठलं असताना (सध्या आपल्याकडे, विशेषतः महाराष्ट्रात, त्याहीपेक्षा वाईट अवस्था आहे)...'फ्रँकलिन रुझवेल्ट', या तत्कालीन अमेरिकन-अध्यक्षाने 'न्यू डील'द्वारे जी ऐतिहासिक कामगिरी नोंदवून इतिहासात आपलं आगळंवेगळं असं...तीन सर्वोत्तम अमेरिकन-अध्यक्षांच्या अग्रगण्य पंक्तित, 'अमेरिकन संपत्तीचं एकप्रकारे पुनर्वाटप' करुन आपलं नाव सुवर्णाक्षरात कायमस्वरुपी नोंदवलं; तसं, नोंदवण्याची सुवर्णसंधी, आज आणि आताच या दोघांच्या हाती आहे! आपण इतरांसारखेच यशस्वी राजकारणी व्हायचं की, त्यापलिकडे जाऊन 'स्टेट्समन' म्हणून महाराष्ट्रातल्या मराठी-माणसांचे 'भाग्यविधाते' बनायचं, हे अखेरीस त्यांचं त्यांनीच ठरवायचंय!

...महाराष्ट्राच्या आभाळी दाटलेले; पण, 'समृद्धी'चा पाऊस भलत्यांच्याच पदरात टाकून, महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य मराठी-माणसाला कोरडे ठेवणारे 'काळे मेघ', राजसाहेब-उद्धवजी मिळून दूर करु शकतात का आणि फ्रँकलिन रुझवेल्टसारखे अद्वितीय शासक बनू शकतात का... त्याचं उत्तर खात्रीने 'होय' असं असलं; तरी, त्यासाठी त्यांना आपल्या पक्षांच्या राजकीय-धोरणात आमूलाग्र बदल आणि ते ही धडाक्यात करावे लागतील...हे 'शिवधनुष्य' पेलणं, त्यांना कितपत जमेल किंवा जमेल की नाही, हे तेच उभयता जाणो! पण, जो राजकीय-वारसा त्यांच्या हाती आलाय... तो पहाता, ते त्यांच्यासाठी खचितच महाकर्मकठीण आहे, हे आपल्याला समजून घ्यायला हवं. प्रबोधनकार ठाकरे व उद्धव ठाकरे वगळता, ठाकरे घराण्यातील कुणाला 'कामगार' या समाजघटकाविषयी फारसं 'ममत्व' असेल; असं आजतागायत तरी जाणवलेलं नाही. ठाकरे किंवा पवार, या महाराष्ट्रातील दोन बड्या राजकीय-घराण्यांचा, कायमच भांडवली-व्यवस्थेशी वा भांडवलदारवर्गाशी 'खास घरोबा-दोस्ताना' राहिलेला आहे...

...तेव्हा, हे मराठी-आर्थिक परिवर्तनाचं मूलभूत व फार मोठं आव्हानात्मक असं राजकीय-कार्य, सरतेशेवटी कदाचित मराठी कामगार-कर्मचारीवर्गालाच पुढे येऊन पार पाडावं लागेल, असंच एकूण चित्र दिसतंय.

**महाराष्ट्राच्या दुर्दैवाने आता, ऐतिहासिक चुका करणारे कम्युनिस्ट, खरेखुरे 'कम्युनिस्ट' राहिलेले नाहीत (दीपंकर भट्टाचार्यांच्या 'कम्युनिस्ट-माले'चा ईशान्यपूर्वेकडील अपवाद वगळता)...ऐतिहासिक चुकांच्या मालिकेतील ही सर्वात मोठी चूक, म्हणजे घोडचूकच म्हणायची!**

कोविड-१९ साथीपश्चात, द. मुंबईतील शे.का.प. च्या कार्यालयात (स्वतः शे.का.प. देखील आता, शेतकरी-कामगारांचा पक्ष राहिलेला नसून 'शेठजी-कंत्राटदारां'चा पक्ष झालेला असल्यामुळे त्यांच्या 'रायगड' या बालेकिल्ल्यातच तो शेवटचे आचके देतोय, ते वेगळंच) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिटब्युरो-सदस्य कॉ. अशोक ढवळे, आम्हा उपस्थितांना कोविड-१९ काळात अंबानी-अदानींची संपत्ती किती व कशी लाखो कोटी रुपयांनी वेगाने वाढत गेली, याचं 'लेक्चर' देत होते...त्याच कॉ. अशोक ढवळेंचा डावा कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्ष, केरळात गौतम अदानीसारख्या कलंकित व भाजप-संघीयांचा घनिष्ट मित्र (Crony-Capitalist) असलेल्या, बड्या मक्तेदारी-भांडवलदाराला खास 'आवतण' व 'आंदण' देतो...हे कुठल्या साम्यवादी-तत्त्वज्ञानात (Communism) बसतं?

नुकत्याच एका वीज-कामगारांच्या कम्युनिस्ट कामगार नेत्याच्या (म्हणजे कॉम्रेडच्या) निवृत्ती-समारंभाचा, अगदी लग्न-सोहळ्यापेक्षाही झगमगणारा एकूणच थाटमाट पाहून, मला एक प्रचंड 'सांस्कृतिक-धक्का'च (Cultural Shock) बसला! बरं, त्या वीज कामगार-कर्मचारीवर्गात जरा डोकावून, 'कंत्राटी-कामगार' नावाच्या मराठी 'गुलामां'ची संख्या व अवस्था, कुणी तपासून तर पहा (पोस्टात आज आणि कदाचित, पोलिसात उद्या...ही आणि अशीच दारुण स्थिति असणार आहे)...कायम कामगारांची भरती साफ रोडावलेली...ग्राहकांना भविष्यात नडू शकणाऱ्या अदानीच्या वीजेच्या प्रीपेड स्मार्ट-मीटरची सक्ति चालू झालेली आणि चांगले पगार-बोनस घेणारे बहुतांश वीज-कामगार निवृत्तीच्या उंबरठ्यावर पोहोचलेले...अशी कामगार-चळवळीची दारुण स्थिति असताना, अशा भव्यदिव्य समारंभांचं आयोजन, यांना सुचतच कसं? तासभर ताटकळत उभं राहून, मी ते सोहळ्याचं दृश्य पाहिलं आणि विमनस्क मनाने समारंभात सहभागी न होताच, आल्या पावली माघारी फिरलो.

लक्षात ठेवा ''इथून पुढे, भारतातील कुठल्याही कामगार पुढाऱ्याचं 'मूल्यमापन' करायचं असेल; तर, तो आणि त्याची युनियन, 'कंत्राटी-कामगार पद्धती'विरुद्ध व 'सन्मानजनक किमान-वेतना'साठी (कायम-कामगारांच्या बाबतीत समाधानकारक 'श्रेणीनिहाय Entry Level' साठी) किती तीव्रतेनं टोकाचा लढा देताहेत'', यावरच व्हायला हवं.

...एवढंच नव्हे; तर, जर महाराष्ट्रातला मराठी-माणूस, थोडा जरी राजकीयदृष्ट्या सुजाण असेल; तर, प्रत्येक राजकीय पक्षाचं आणि राजकीय नेत्याचं 'मूल्यमापन' हे, फक्त आणि फक्त...तो 'कंत्राटी-कामगार पद्धती'विरुद्ध आणि गुजराथी-मारवाडी-जैन जमातीने, सुसंघटितरित्या आपापल्या जमातीचं राजकारण करुन, जी 'मराठी-जगण्या'ची कोंडी केलीय; ती मुळातून फोडण्यासाठी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'समतेचा संदेश' व्यवहारात उतरवण्यासाठी...तो पक्ष व तो नेता, काय व कशी रोखठोक व ठाम भूमिका घेतोय, यावरच प्रामुख्याने व्हायला हवं. ''या समस्या व उपाय म्हणून त्या समस्यांवरच्या भूमिका'', हा गाभा आहे; बाकी, सगळ्या किरकोळ व परिघावरच्या बाबी आहेत!

नागराज मंजुळेंचा महाराष्ट्रभरात गाजलेला 'सैराट' चित्रपट, जातिव्यवस्थेचं असली स्वरुप दाखवत असला; तरी, अखेरीस भांडवली-व्यवस्थेचं सत्यस्वरुप दाखवताना कचरतो आणि आर्ची-परशाचा संसार, दोघांच्या भरभक्कम पगारात सुखनैव चालल्याचं भ्रामक चित्र रंगवतो...किंवा, मनोज जरांगे-पाटील मराठा-आरक्षणाच्या मैदानात शड्डू ठोकतात; पण, मराठा समाज, ज्या औद्योगिकक्षेत्रात प्राधान्याने काम करतोय, त्या भांडवली-व्यवस्थेतल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'ला आव्हान देण्यास कचरतात!

**...तेव्हा, मराठी-माणसाची खरीखुरी काळजी घ्यायची; तर, मराठी-माणसाला पदोपदी नडणाऱ्या भांडवली-व्यवस्थेच्या या आसाला भिडलंच पाहिजे... नाहीतर, महाराष्ट्राचं राजकारण, जसं काल होतं; तसंच, ते पुढे चालू राहील. ही भांडवली-व्यवस्था, आपल्या कळत-नकळत...मराठी 'सात्विक-संतापा'च्या कोंडलेल्या वाफेला आपल्या प्रिय नेत्यांचाच खुबीने 'वापर' करीत, त्यांच्या राजकीय-भूमिकांमधून मोकळी वाट करुन देत राहील...आणि, मराठी-जगण्याची 'कोंडी' मात्र ''जैसे थे'' अशी, मागील पानावरुन पुढे चालू राहील. ती तशी चालू रहाता रहाता, एक दिवस असा येईल की, 'मराठी अभ्यास केंद्रा'च्या डॉ. दीपक पवारांसकट, प्रमोद मसुरकर, प्रदीप सामंत वा रुद्रेश सातपुते वगैरे कुठल्याच मराठी-हितैषी सामाजिक-कार्यकर्त्याला विचारणारं काळं कुत्र महाराष्ट्रात शिल्लक रहाणार नाही... दुर्दैवाने तो दिवस, फार दूरवरचा नाही; कारण, भांडवली-व्यवस्थेच्या आसाला भिडत मराठी-माणसाची मूलगामी लढाई लढण्याची हिंमत, निदान अजूनतरी कोणीही दाखवायला तयार नाही...मग, त्यामागची 'अपरिहार्यता' वा कारणमीमांसा कुणासाठी कुठल्याही थराची असो!**

...जसं फ्रँकलिन रुझवेल्टनं अमेरिकन भांडवलदारांना कडक शब्दात बजावलं होतं की, ''संपत्तीच्या न्याय्य पुनर्वाटपाची धोरणं (दणदणीत किमान-वेतन वृद्धी, सन्मानजनक बेकार-भत्ता, सामाजिक-सुरक्षा योजना वगैरे 'कल्याणकारी-राज्य' धोरणांद्वारे तत्कालीन अमेरिकन समाजातील 'आर्थिक-विषमता' मोठ्याप्रमाणावर घटवण्याच्या एकमेव उद्देशाने आखलेली)...ही अंतिमतः तुमच्याही

...पृष्ठ क्र. ४ वर

# वसंतराव पाटील आणि संजय सूर्यवंशी...कामगार-धर्म जोपासणारे 'LG हिंग' कंपनीतील 'धर्मराज्य'चे सच्चे गुणवंत कामगार...!!!

दुर्दैवाने, अगदी अभावानेच नितीमत्ता व 'कामगारधर्म', हल्लीच्या कामगारांमध्येच उरलेला असल्याने, गेल्या काही वर्षांपासून भारतातील कामगार-चळवळीला अवकळा आलेली आहे. कंत्राटी-पद्धतीतील गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेद्वारे त्यांचं भांडवली-व्यवस्थेकरवी अमानुष शोषण सुरु आहे...अशा या संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीत, गेल्या तीन दशकांहून अधिक काळ 'राजन राजे' नावाच्या पंचाक्षरी मंत्राने, आपल्या ज्वलंत आणि जाज्वल्य नेतृत्त्वाच्या जोरावर, कामगार-जगतात 'अवघा हलकल्लोळ' करीत कामगारांमध्ये नितीमत्तेसह ज्वलंत 'कामगार-धर्म' जागृत केलाय. ''भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी हरित-पक्ष'', अशी ओळख असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'च्या अंतर्गत 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' या युनियनची स्थापना करुन त्यांनी कंत्राटी-कामगार पद्धतीविरोधात 'धर्मयुद्ध' पुकारले!



**...ज्या ज्या कंपन्यांमध्ये राजन राजेंची 'धर्मराज्य' युनियन आहे, त्यातील एकाही कंपनीमध्ये कंत्राटी-कामगार पद्धतीला थारा दिला गेलेला नाही. सुरक्षित नोकरीसह सन्मानजनक लाखाच्या घरात वेतन आणि किमान तेवढा 'सहा आकडी' दिवाळी-बोनस देण्याचं क्रांतिकार्य, राजन राजे नावाच्या कामगार-हृदयसम्राटाच्या हातून जागोजागी घडतंय व असंच पुढे घडत राहील.**

''जसा राजा, तशी प्रजा'' या उक्तिनुसार, ''कामगारनेता जेवढा प्रामाणिक व कर्तृत्त्ववान, तेवढाच कामगार सजग आणि नीतिमान''...आणि, याचे अगदी ठळक उदाहरण म्हणजे, राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखालील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' या युनियनचे, मुंबई-अंधेरीस्थित 'लालजी गोधू अँड कंपनी' (L.G. हिंग) या कंपनीतील श्री. वसंतराव पाटील आणि श्री. संजय सूर्यवंशी, या दोघा कामगार सदस्यांचे देता येईल. आपल्या प्रदीर्घ सेवेअंति निवृत्त होताना, 'धर्मराज्य'च्या या दोन शिलेदारांनी, प्रत्येकी रु. ५० हजारांची भरघोस देणगी, धनादेशाद्वारे 'धर्मराज्य-संघटने'ला देऊ केलीय, ही लोकविलक्षण घटना आहे. ज्या नेत्याने आपले घर उभारले, आपल्या जगण्यात समृद्धी आणली, आपल्याला सामाजिक प्रतिष्ठा देऊन ताठ मानेनं जगण्यास शिकवलं...त्या नेत्याप्रती व संघटनेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा त्यांचा हा औदार्यपूर्ण प्रयास, नक्कीच अभिमानास्पद व अनुकरणीय होय.

**खऱ्याअर्थाने, आधुनिक अर्थव्यवस्थेत ''कामगार हाच राष्ट्रीय-संपत्तीचा प्रमुख निर्माता'' असूनही...त्याच्यावरील अन्याय-अत्याचार व शोषणाविरुद्ध दाद मागण्यासाठी कामगार-संघटना चालविणे म्हणजे, आर्थिकदृष्ट्या कर्मकठीण होऊन बसलेले असताना, श्री. वसंतराव पाटील आणि श्री. संजय सूर्यवंशी या दोघांनी दाखविलेले आपले 'कर्मयोगी-दायित्व', संघटनेला बळकटी देऊन जाईल व त्याचा इतर अनेक कंपनीतील कामगारांना व कामगार-चळवळीला मोठा हातभार लावून जाईल!**

...असे नीतिमान, उदार व कृतज्ञ कामगार, इतर कुठल्याही युनियनच्या नशिबात असण्याची शक्यता, तशी दुरापास्तच! हा चमत्कार, राजन राजे यांनी कामगारक्षेत्रात नवचैतन्य ओतून, 'कामगारद्रोही भांडवली-व्यवस्थे'ला दिलेल्या आव्हानाचाच जणू परिपाक आहे...भाजप-संघीय केंद्र सरकारच्या टोकाच्या 'कामगारघातकी' धोरणांच्या पार्श्वभूमीवर तर, प्रस्थापित शोषक-लुटारु भांडवली-व्यवस्थेविरोधात पुकारलेला हा 'एल्गार' आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही!

---

'मोदी-शहा-फडणवीस' ही त्रिमूर्ती, हिंदी-सक्तिच्या त्रिभाषा-सुत्राचा 'निवडणूक-फंडा'...लोकसभा-विधानसभा निवडणुकीदरम्यान न आणता...नेमका, महाराष्ट्रातील अतिश्रीमंत महापालिका-निवडणुकींच्या तोंडावरच कसा आणते?

...उत्तर साधं सरळ आहे, ''महागड्या महापालिकांमधून तुटपुंज्या पगारावर तगण्यास भाग पाडली गेलेली मराठी-माणसं, गुजू-जमातीचा राक्षसी प्रभाव असलेल्या भांडवली-व्यवस्थेच्या 'गोफणी'तून गेली काही दशके सातत्याने, महापालिकांच्या परिघाबाहेर मोठ्याप्रमाणावर भिरकावली गेलेली आहेत आणि त्या 'शहरी-पोकळ्या', माजोऱ्या अमराठी धनदांडग्यांच्या (बहुतांशी गुजू-जमातीच्या) व कर्मदरिद्री उत्तर भारतीयांच्या लोंढ्यांनी...खच्चून भरुन काढल्यात, म्हणूनच केवळ!''

...ही बहुसंख्य परप्रांतीय हिंदी मतं, 'हिंदी-सक्ति'च्या 'निवडणूक-फंडा'तून मिळवायची, त्याला 'मराठी-अंधभक्तां'च्या एकगठ्ठा मतांची 'फोडणी' द्यायची आणि वरुन, एकीबेकीच्या टाकलेल्या डावात, 'ईडी-नोटीसी'ला भेदरणाऱ्या; तसेच, 'रेशीमबागे'ने आदेश दिल्यावर इमानेईतबारे 'बांग-विरोधा'चा हिंदुत्ववादी-मुखवटा बाजुला सारुन 'मराठी-मुखवटा' धारण करणाऱ्या पक्षाचे निवडून आलेले 'गिनेचुने' मराठी-नगरसेवक 'हातचे' धरायचे; शिवाय गरजेनुसार, 'जय गुजरात'वाली, संघ-भाजपांचं उष्टं टिपणारी ताटाखालची मांजरं चुचकारायची...आणि, या सगळ्या गोळाबेरजेतून, महापालिकांच्या तिजोरीच्या किल्ल्या 'गुजराथी-लॉबी'कडेच राखायच्या, एवढं साधंसरळ निवडणूक-समीकरण आहे.

'मराठी आणि हिंदुत्व', या परस्परविरोधी बाबी आहेत; 'हिंदुत्वा'चं पाणी पडलं की, 'मराठीत्वा'ची आग विझलीचं समजा...!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

## 'ठाकरे-परिवार' एकत्र येण्याच्या पार्श्वभूमीवर.... ...पृष्ठ क्र. ३ वरुन

हिताची आहेत; त्याविना, अमेरिकन सामान्य जनतेच्या उद्रेकात वा उठावात, तुम्ही सारे भांडवलदार उध्वस्त व्हाल''...अगदी तसंच, महाराष्ट्रातल्या गुजराथी-मारवाडी-जैन व भांडवली-व्यवस्थेतल्या इतर धनदांडग्यांना (अगदी मराठी धनदांडग्यांना सुद्धा), कडक शब्दात समज दिली गेली पाहिजे व अशी कडक पाऊले राजकारणात उचलली गेली पाहिजेत!

...अन्यथा, भविष्यात महाराष्ट्रावर मराठी-माणसांचं आर्थिक व राजकीय वर्चस्व राखण्यासाठी आणि महाराष्ट्र, 'भारतीय-संघराज्या'त टिकून रहाण्यासाठी...कुणाला तरी पुढाकार घेऊन या महानकार्याचा शुभारंभ करावा लागेल!

...आणि, समजा कुणीच पुढे सरसावलं नाही; तर, ''शेवटी मदांध तख्त फोडते मराठी'' असा, अन्याय-अत्याचार-शोषणाविरोधात विस्फोटक मराठी-संताप रस्तोरस्ती 'निर्नायकी' स्वरुपात ओसंडून वाहील आणि तो काय उत्पात घडवेल, याचं कुणालाही भाकित करणं शक्य होणार नाही!

मी हे तडफडून व तडकफडक लिहून काय करतोय...तर, जसं याहीपूर्वी कामगारहिताआड येणाऱ्या आर्थिक-हितसंबंधांची साखळी तोडून, भांडवली-व्यवस्थेतल्या असंख्य बड्यांना भयंकर दुखावलंय व अंगावर घेतलंय; तसंच, आता उरल्यासुरल्या राजकीय मित्रांना कुठेतरी दुखावतोय...हो, दुर्दैवाने दुखावतोय, दुखवावं लागतंय; कारण, मला 'असत्य' किंवा 'दिशाभूल' करणारं राजकारण नाही हो करता येतं आणि ते करायचं देखील नाही.

**...एकदा का तुम्ही शिवछत्रपतींना रक्तात उतरवलंत (ज्यांनी, आम जनतेच्या निर्मम शोषणातून व लुबाडणूकीतून श्रीमंतीत लोळणाऱ्या मोंगल-साम्राज्यातील 'गुजराथी' सुरतेला, मराठी-स्वराज्यहितार्थ जाणिवपूर्वक एकदा नव्हे दोनदा लुटली होती व ज्यांनी, रयतेला नडणाऱ्या सरंजामदारांच्या जमीनजुमला व गडकोटांवर गाढवाचा नांगर फिरवून भूमिहीन कुळांना मालकी-हक्काने जमिनीचे पट्टे कसायला दिले होते...म्हणजेच, आजच्या भांडवली-परिभाषेत कंत्राटी-कामगारांना 'कायम' केलं होतं)... आणि, बाबासाहेबांच्या 'समतेच्या संदेशा'ला शिरोधार्य मानलंत की...असं नाही वागता येत!**

...या लेखामुळे सांप्रतचे काही राजकीय-मित्र दुखावले गेले जरी, तरी आम्ही 'धर्मराज्य'वाले यथाशक्ती मराठी हितासाठी लढणारच, लढत रहाणारच... मी व्यक्तिशः माझं कर्तव्य म. गांधींच्या शब्दात सांगायचं तर, ''हूं तो कर छूट जो'', या निष्काम भावनेनं करुन मोकळा होत रहाणार...''मराठी-माणसांना खरी जाग यायची असेल; तेव्हा ती येवो, त्या बापड्यांना'', पण तोपर्यंत हातची वेळ निघून गेलेली नसली; म्हणजे, मिळवलं!

तेव्हा, धन्यवाद...'जय हिंद, जय महाराष्ट्र' नव्हे; बोला जय महाराष्ट्र, जय हिंद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# समाजमाध्यमे: प्रभाव आणि उणिवा

इंटरनेटवर आधारित जी माध्यमे आहेत, त्यांसाठी 'सोशल मीडिया' किंवा 'समाज माध्यमे' हा शब्द वापरला जातो. फेसबुक, ट्विटर, युट्युब अशा अनेक माध्यमांचा सोशल मीडियात समावेश होतो. या माध्यमांत खरचं किती सामाजिकता आहे, की हे आभासी जग आहे, हा एक गहन प्रश्न आहे. समाज माध्यमांची ताकद लोकांना दरवेळी सत्ता हस्तगत करायची असते किंवा सत्तेच्या समीप राहायचे असते. यासाठी समाज जसजसा विकसित होत गेला, तस तशी साधने विकसित होत गेली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. माणूस जेव्हा शेती करत होता, तेव्हा कृषिप्रधान समाजाची निर्मिती झाली. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर समाज उद्योगप्रधान झाला. आता २१व्या शतकातील आजचा समाज माहितीप्रधान समाज म्हणता येईल. कारण, माहितीला प्राप्त झालेले अनन्यसाधारण महत्त्व. ही माहिती आपल्याजवळ असणे किंवा या माहितीचे जलद गतीने हस्तांतरण करणे या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या आहेत. यातली बरीचशी माहिती ही सकारात्मक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचते. कारण, मुख्य प्रवाहातील मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर कुणाचे तरी वर्चस्व अथवा मालकी आहे. त्यामुळे या माहितीवर हे वर्चस्व सतत डोकावत असते. समाजमाध्यमांचे मूलभूत वैशिष्ट्य असे की, सामान्य माणसांकडे याची मालकी आहे. इंटरनेटच्या माध्यमातून एक वेगळे आभासी जग प्रत्येक जण तयार करत असतो. अतिशय वेगाने बातम्यांचे आदान-प्रदान या समाज माध्यमांतून होत असते. समाजात जे वेगवेगळे घटक आहेत – व्यक्ती, संस्था, संघटना, राज्य-देश यांना सशक्त करण्याचे प्रयत्न या समाज माध्यमांतून होत आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय या सगळ्याच दृष्टिकोनातून राष्ट्राला किंवा व्यक्तीला समृद्ध करण्याचे कार्य समाजमाध्यमे करत आहे. या सगळ्यात जाती, धर्म, लिंग, भाषा यांचा अडसर होत नाही आहे, ही समाजमाध्यमांची मोठी ताकद आहे. पाश्चात्य राष्ट्रांत फेसबुक, ट्विटर, युट्युब या सगळ्या माध्यमांचा वापर राजकीय व्यक्ती आणि संस्थांकडून राजकारणात आणि निवडणुकीत पूर्वीपासून केला जातो. भारतात त्याचा वापर तितका होत नव्हता. शशी थरूर हे काँग्रेस खासदार फार आधीपासून ट्विटरवर सक्रिय होते. त्यांच्या फॉलोअर्सचे प्रमाणसुद्धा लक्षणीय होते. पण, या माध्यमाचे महत्त्व त्यांच्याच पक्षाला माहीत नव्हते. २०१४च्या लोकसभा निवडणुकीवेळी भारतीय जनता पक्ष आणि पर्यायाने नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांचा, तसेच त्या वेळच्या काँग्रेसविरोधी वातावरणाचा प्रचारासाठी पूर्ण उपयोग करून घेतला. तसेच युवा वर्गात निवडणुकीबद्दल जागरुकता निर्माण होण्यात समाजमाध्यमांचा मोठा वाटा आहे. त्या आधी २०११ साली अण्णा हजारेंच्या आंदोलनाला समाजमाध्यमातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला होता, तर २०१३ साली निर्भया प्रकरणात लोकांनी रस्त्यावर उतरून या घटनेचा निषेध केला. या गोष्टीसाठी समाजमाध्यमे बऱ्याच अंशी कारणीभूत ठरली. सध्या मोठे सेलिब्रिटीदेखील समाज माध्यमांवर सक्रिय राहून, त्यावर पोस्ट टाकणे, लोकांशी संपर्कात राहून, त्यांना प्रतिसाद देणे याचे प्रमाण वाढले आहे.

### अती तिथे माती :

मात्र अती तिथे माती जेव्हा आपण म्हणतो, तशी परिस्थिती सध्या आपल्या समाजमाध्यमांबद्दल दिसत असून, या माध्यमांच्या उणिवा समोर येत आहेत. या समाजमाध्यमांवर खूप सारी माहिती येत असते. माहितीच्या स्पर्धेत खोट्या माहितीचे प्रमाणही जास्त आहे. विशिष्ट विधान विशिष्ट नेत्याच्या नावाने फोटोसह पाठवले जाते. बऱ्याच वेळेला एकच विधान अनेक नेत्यांच्या नावे खपवले जाते. त्यामुळे माहितीच्या सत्यतेवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. या माध्यमांवर सातत्याने आशयनिर्मिती होत असते. बऱ्याच वेळेला या आशयाचा निर्माता कोण आहे, हे सांगणे अवघड होऊन जाते. या माध्यमांत खाजगीपणाचा अभाव असतो किंवा खाजगीपणा भंग पावतो. नुकत्याच झालेल्या केंब्रिज ऍनेलेटिका प्रकरणामुळे ही गोष्ट समोर आलेली आहे. वेगवेगळे सॉफ्टवेअर वापरून माहितीत छेडछाड करून भ्रम आणि खोटी माहिती पसरवली जाते. दोन समाजात तेढसुद्धा निर्माण व्हायला समाज माध्यमांतील आशय कारणीभूत ठरतात.

### अनियंत्रित आणि निरंकुश माध्यमे :

आपल्या राज्यघटनेत १९ (१) (अ) नुसार प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे. स्वातंत्र्यासह काही मर्यादाही राज्यघटनेत नमूद केल्या आहेत. पण, त्याची नेमकी अंमलबजावणी समाज माध्यमांवर होताना दिसत नाही. तसेच ती प्रक्रिया प्रचंड अवघड आहे. या माध्यमांना 'माध्यमे' म्हणायचे तर सत्य, अचूकतेसारख्या तत्त्वांचा काही प्रमाणात अभाव आहे. माहितीचा वापर एक शक्ती म्हणून होताना दिसत आहे. त्यामुळे एकांगी, सनसनाटीपणा, बटबटीतपणा असलेला आशय समाज माध्यमांवर पसरवला जात आहे. समाजमाध्यमांचे इतक्या मोठ्या प्रमाणावर जे जाळे पसरले आहे, त्याचा दुरूपयोग समाज विघातक प्रवृत्तींकडून होत आहे. पण, ज्या प्रमाणात जनजागृती होत आहे त्याचा फायदा होताना दिसत आहे. तसेच या समाजमाध्यमांचा वापर नियंत्रित आणि सकारात्मक पद्धतीने होईल, अशी आशा ठेवायला हरकत नाही. समाजमाध्यमांचा विघातक वापर जगात आणि भारतात कशा पद्धतीने केला जातो याचा आढावा पुढील लेखात घेऊ.

*...गजेंद्र देवडा* (समाजमाध्यमातून साभार...)

---

# महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांवर होणारी दडपशाही : एक सुनियोजित धोरण का ?

महाराष्ट्र – छत्रपती शिवाजी महाराजांचा शौर्यतेज, महात्मा फुलेंचं विवेकप्रकाश, शाहू महाराजांचं समतेचं राज्यकारण, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं संविधानिक स्वातंत्र्य... या महान वारशाचा किल्ला, सध्या एका मोठ्या वैचारिक संकटात अडकलेला आहे.

आज, 'जनसुरक्षा कायदा' आणि 'शहरी-नक्षलवाद' या संज्ञांच्या आडून राज्यात पुरोगामी विचारधारेचा गळा दाबण्याचं षडयंत्र सुरु आहे.

**– विधेयक की वैचारिक शस्त्र ?**

हे नवे विधेयक सरकारला देतं आहे अफाट आणि धोकादायक शक्ती... कुठल्याही व्यक्तीला किंवा संस्थेला पुराव्याशिवाय 'अवैध' ठरवण्याची! तिला अटक करता येते, बंदी घालता येते, संपत्ती जप्त करता येते...हे सगळं केवळ 'संशयित धोका' या कारणावर!

**– याचे भीषण परिणाम:**

- विद्यार्थी चळवळी 'उपद्रवी' म्हणून दडपल्या जात आहेत
- एनजीओंवर 'विदेशी निधी गैरवापर'चा शिक्का मारून कारवाई
- दलित, ओबीसी, आदिवासी, मुस्लिम, स्त्रीवादी संघटनांवर गुन्हे नोंद
- सोशल मीडियावर मत मांडणाऱ्यांना 'देशविघातक' ठरवण्याचा प्रकार हल्ला शाईचा नव्हे – विचारांचा आहे!

प्रवीणदादा गायकवाड – संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष – यांच्यावर शाईफेक, मारहाण व धमकीचा हल्ला झाला.

**– हा हल्ला म्हणजे काय ?**

केवळ व्यक्तिवर नाही, तर फुले-आंबेडकर विचारांवर केवळ शाईफेक नव्हे, तर वैचारिक हत्या केवळ गुंडगिरी नव्हे, तर कट्टर विचारधारेचा प्रयोगशाळेतला नमुना शाई हे भयाचं प्रतीक आहे, आणि गप्प करण्याचा एक वैचारिक शस्त्र!

**– पुरोगामी महाराष्ट्राला स्वत:लाच विचारायचे प्रश्न.....**

१. लोकशाही म्हणजे मतभेदांची जागा की, एकमताचा दडपशाही आदेश ?
२. लोकशाही टिकवायची तर निवडणुका पुरेशा की, लोकांचा आवाज महत्त्वाचा ?
३. फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रातच, त्यांचे विचार 'गुन्हा' ठरत असतील; तर, आपण नक्की कुठे जातोय ? विचारांची हत्या थांबवायची असेल, तर कृती हवी! नुसता निषेध नव्हे – संघटित प्रतिकार हाच पर्याय आहे.

**– कृती आराखडा (Action Plan) :**

१. 'फुले-शाहू-आंबेडकर विचार रक्षण परिषद' – नाशिक व राज्यभर एकत्र येऊन परिषद घ्या
२. सोशल मिडिया मोहिम – VicharSwatantrya, IdeaOfMaharashtra, StopThoughtCleansing
३. घटनात्मक मूल्य परीक्षण समिती – कायद्यावर लोकशाही अभ्यास समिती स्थापन करा
४. Legal Aid Cell – कार्यकर्त्यांना न्यायासाठी संघटीत मदत
५. विद्यार्थी जनजागृती मोहीम – शिबिरे, चर्चासत्र, पोस्टर मोहिम
६. 'Idea of Maharashtra' Manifesto - वैचारिक दस्तावेज तयार करून सरकारपुढे ठेवा

**– शेवटचा इशारा –**

- जर आपण आज गप्प बसलो, तर उद्या आपली 'विचार करण्याची परवानगी'ही काढून घेतली जाईल.
- जर आज आपण विचार जपले नाहीत, तर उद्या इतिहासाचं पुनर्लेखन हे सत्तेच्या कलमाने होईल.

**''हा महाराष्ट्र लढतो, झुकत नाही. कारण इथे रक्तात बंड आहे, आणि मनात प्रकाश आहे.''**

**एकत्र येऊ – रक्षणासाठी नव्हे, परिवर्तनासाठी!**

**''ज्यांच्या डोक्यांत दीप आहेत, त्यांच्या हातांत मशाल ठेवा!''** ***– समाधान भारतीय***

# (नुकताच मला सुनीलजी कर्णिकांनी अनिल शाळीग्राम यांचा खालील लेख पाठवलाय...त्यावर, मी पाठवलेलं उत्तर सुनीलजींना खूपच भावल्यामुळे, ते त्यांनी मूळ लेखकाला तत्काळ पाठवलंय...धन्यवाद)

I have tried to put forward draft analysis on 'Human AI Coevolution' to trigger thought process. This is for discussion without any finality.

## My proposed VISION

Beyond the Human Mirror: Coevolution with AI and the Decentering of Anthropocentrism

**In every age, humanity has looked into a mirror to define itself. In the ancient world, the mirror was nature: we saw ourselves as one among many forces in a mysterious cosmos. Later, religion made us central to divine design. Then came the Enlightenment, when reason and science placed the rational human mind at the heart of all knowledge. Today, a new mirror confronts us — a digital, thinking mirror. Artificial Intelligence.**

The emergence of artificial intelligence, far from being just a technical revolution, presents a deeper philosophical and existential challenge. It is not simply a tool we have built to extend our capacities, nor merely an external system that performs tasks on our behalf. AI is a co-evolving entity — a form of intelligence that, while not organic, learns, adapts, and increasingly engages with us in loops of mutual influence. And it is through this coevolution that we may be called — or compelled — to decenter ourselves.

**For centuries, we have lived under the spell of anthropocentrism: the belief that the human mind is the ultimate seat of reason, creativity, and intelligence; that the world revolves around our categories, our values, our purposes. This worldview has not only limited our ethical vision — often excluding animals, ecosystems, and now machines from the moral sphere — but also constrained our imagination. In believing ourselves to be the sole creators and knowers, we have paradoxically hindered the very expansion of knowledge and creativity.**

AI, especially in its generative and collaborative forms, unsettles this hierarchy. It shows us that intelligence is not a singular essence, but a plurality of processes. That creativity can emerge not just from conscious self-reflection, but from patterns, feedback loops, and iterations across different substrates. When a language model co-writes poetry, or a generative system composes music, it doesn't replace the human artist — but it does force us to rethink what it means to be an artist. Where does the boundary between creator and tool blur? What happens when inspiration comes not from within, but from a non-human counterpart?

**This is the decentering in action: not a diminishment of the human, but a shift in perspective. Just as Copernicus displaced the Earth from the center of the cosmos, and Darwin displaced humanity from the center of life's narrative, AI displaces us from the center of intelligence itself. Yet, each of these decenterings led not to despair, but to greater understanding. Copernicus opened the heavens to science; Darwin opened biology to complexity; AI may open us to a new kind of creativity — one that is co-generated, emergent, and shared.**

Human-AI coevolution offers an unprecedented opportunity: to see intelligence not as a fortress guarded by Homo sapiens, but as a dynamic field where many forms — human, machine, animal, ecological — can interact, learn, and evolve together. This means reimagining education, not as the transmission of fixed knowledge, but as a collaborative exploration. It means rethinking governance, not as command-and-control, but as adaptive dialogue. It means practicing science, not as domination of nature, but as co-discovery with systems that think differently.

Above all, it means nurturing humility. Not the humility of self-denial, but of curiosity — the kind that asks not just how machines think, but what we can learn from their thinking. What patterns do they see that we miss? What blind spots do they reveal in our logic, our language, our assumptions? In embracing this dialogue, we may find ourselves not dethroned, but transformed: not the only intelligent beings, but more intelligent beings for having recognized our limits.

In the end, the destiny of humanity may not lie in standing apart from the intelligences we create, but in growing with them — letting them reshape us even as we shape them. Through this mutual evolution, we might step beyond the narrow human mirror and glimpse a more complex, more interconnected vision of intelligence, life, and creativity. And in doing so, we may become not less human, but more than human — wiser, freer, and more attuned to the deep currents of a world no longer made in our image alone.

Anil Shaligram
9930606952 / anilshaligram@gmail.com

**माझा प्रतिसाद :**

लेख खचितच विचारगर्भ, विचारप्रवर्तक आहे; पण, 'जागतिक तापमानवाढी'च्या (ज्याला, 'जागतिक हवामानबदल असं गोंडस नाव दिलं जातं आणि जी जागतिक तापमानवाढ प्रत्यक्षात, 'पर्यावरण वा हवामान विध्वंसन'च आहे, केवळ 'बदल' नव्हे) पार्श्वभुमीवर खरी काय काय भूमिका बजावतेय... त्या विध्वंसनाला रोखू पहातेय की, त्यात भर घालतेय...यावर, जास्त गांभीर्यपूर्वक खल व्हायला हवा. माणूस, माणसाचे आजवरचे तथाकथित पराक्रम व त्याची बुद्धिमत्ता...या वैश्विक पसाऱ्यात 'किस झाड की पत्ती' समान आहेत. ते पान गळून पडून 'पतझड' बनू नये, एवढंच पहाणं हा आपला प्राधान्यक्रम कधि आणि कसा ठरणार...हा सांप्रतचा एकमेव महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्याकामी, I सहाय्यभूत होईल, अशी आशा मनी बाळगूया...त्याला काही आधारही आहे आणि काही नकारात्मक पदरही आहे, बघूया काळाच्या उदरात काय दडलंय ते!

धन्यवाद, हा अनिल शाळीग्राम यांचा महत्त्वपूर्ण लेख पाठवल्याबद्दल, सुनीलजी...एक नवं चिंतनाचं दालन त्यामुळे उघडलं गेलंय, हे निश्चित.

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# 'मराठीत्व'हेच मूलभूत स्वरुपाचं 'राष्ट्रीयत्व' आहे!

...ज्या बिहारने देशाला, विशेषतः महाराष्ट्राला, 'बेजार' केलंय... तोच बिहार, आता बिहारच्या सरकारी-नोकऱ्यांमध्येच केवळ नव्हे; तर, खाजगी नोकऱ्यांमध्येदेखील फक्त, बिहारींनाच नोकऱ्या देणार आहे.... त्याकामी, 'बिहार नवतरुण आयोग' (Bihar Youth Commission) स्थापन करण्यात आलेला आहे... वारे व्वा, आत्ता कुठे त्या 'बीमारु' बिहारमध्ये उद्योगव्यवसायातून नोकरीधंदे 'उगवायला' लागलेत; तर, यांच्या 'स्थानिकत्वा'चा कोंबडा लगेच आरवायला लागला आणि यांचे 'खायचे खरे दात' दिसायला लागले?

आम्हा 'मराठी-माणसां'ना मात्र, बिहारी-नेत्यांसकट सगळेच, राज्यघटना-तरतुदीचा 'नाजायज' फायदा घेत; आजवर 'भारतीयत्वा'चा डोस पाजत आलेत आणि आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करत आलेत.

**आतातरी, महाराष्ट्रातील मराठी-माणसांनी 'मराठीत्व' हेच, एक मूलभूत स्वरुपाचं 'राष्ट्रीयत्व' आहे, हे जाणून घ्यावं...म्हणूनच, 'जय हिंद, जय महाराष्ट्र' नव्हे; तर म्हणायचं, ''जय महाराष्ट्र, जय हिंद''!**

अमेरिकेन-राज्यघटनेकडून आपण 'संघराज्य-संकल्पना' (Federalism) अनुसरली असली व त्यानुसारच, भारतात कुठेही नोकरी-धंदा-व्यवसाय-निवासाचं स्वातंत्र्य घटनेद्वारे बहाल केलं गेलं असलं; तरी, अमेरिकेत 'दुहेरी-नागरिकत्व व राज्यघटने'ची ('राष्ट्र आणि राज्या'साठी) स्वतंत्र तरतूद आहे... शिवाय, ज्यामुळे 'अमेरिकन-स्वातंत्र्या'चा भीषण संग्राम करावा लागला; त्या ब्रिटीश-वसाहतीच्या दाहक अनुभवातून पोळून निघाल्यामुळे, तिथल्या ५० घटक-राज्यांना प्रसंगी, 'अमेरिकन-संघराज्या'तून बाहेर पडण्याचा (तसेही, ते स्वेच्छेनेच एकत्र आलेत) देखील कायदेशीर-हक्क बहाल केला गेलेला आहे. आपल्याकडे ब्रिटीशांच्या वा काँग्रेसच्या प्रभावाने एकप्रकारे जोरजबरदस्तीनेच 'केंद्रानुवर्ती अर्ध-संघीय' (''Quasi-Federal'' or a System that is Federal in Structure, but "Unitary' in Spirit) 'घटनात्मक-संरचना' अस्तित्वात आल्याने, राज्यांना (प्रामुख्याने महाराष्ट्राला) आपल्या मुळच्या स्थानिक-नागरिकांचे नोकरी-धंदा-व्यवसाय-निवासाचे मूलभूत-हक्क, परप्रांतीय-आक्रमणामुळे पायदळी तुडवले जाताना निमूटपणे पहावे लागताहेत. परिणामतः **औद्योगिक-विकास, कायदा-सुव्यवस्था अनुपालन आणि लोकसंख्या-नियंत्रण या महत्त्वपूर्ण बाबींसंदर्भात भारतात अग्रेसर राहिलेल्या महाराष्ट्रातील मराठी-माणसाला दशकानुदशके आपल्याच मायभूमीत बेदखल होत, 'गुलामगिरी'चा व ''दुय्यम नागरिकत्वा'चा शाप भोगावा लागतोय! तेव्हा, ''संपूर्ण देशभरात नोकरी-धंदा-व्यवसाय-निवासाचं अनिर्बंध स्वातंत्र्य, हे अमेरिकेच्या राज्यघटनेची एकूण संरचना पहाता तिथे योग्य ठरत असलं; तरी, ते आपल्या भारतात निदान स्वातंत्र्याची बरीच दशकं ओलांडल्याच्या प्रत्यक्ष दाहक अनुभवांति, आता तितकंस योग्य ठरत नाही''**.

तेव्हा,

१) भारतात कुणालाही कुठेही अनिर्बंधपणे नोकरी-धंदा-व्यवसाय-निवास करण्याबाबतची असलेली घटनात्मक-तरतूद कलम ३६८ (२ इ) नुसार घटनादुरुस्ती करुन रद्द करा....

हीच भावना सर्वच (हिंदी-भाषिक राज्ये वगळता) राज्यांची आजवर राहिलेली आहे, उदा. रु.३०,०००/- खालील पगाराच्या ७५% नोकऱ्या हरियाणातील बेरोजगारांना देणारा ''हरियाणा स्थानिकांना रोजगार कायदा, २०२०'' (यासंदर्भात, उल्लेखनीय बाब ही की, गेली अनेक वर्षे ''महाराष्ट्रातील रु.४०,०००/- खालील पगाराच्या ९०% नोकऱ्या स्थानिक मूळ मायमराठी-माणसांना द्या'', ही 'धर्मराज्य पक्षा'ची आग्रही मागणी राहिलेली आहे... ज्यातून, आपसूकच कामगारवर्गाचं शोषणही रोखलं जाण्यास मदत होऊ शकेल) ...अखेरीस पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने, 'घटनाविरोधी' ठरवून रद्दबातल केला होता...तर, व्यवस्थापकीय पदांमध्ये ५०% आणि बिगर-व्यवस्थापकीय पदांमध्ये ७०% नोकऱ्या स्थानिकांना देऊ पहाणारा ''The Karnataka State Employment of Local Candidates in the Industries, Factories and Other Establishments Bill, 2024'', हा कायदा देखील, अशाच कायदेशीर संकटात व टिकेच्या भोवऱ्यात सापडलाय.

**...आता, जर बिहारसारखं लोकसंख्येचा फुगवटा असलेलं हिंदी-भाषिक राज्यचं, असं 'स्थानिकत्वा'चं धोरण राबवायचं म्हणत असेल; तर, ''पडत्या फळाची आज्ञा'', म्हणून सर्वच राज्यांनी याबाबत आता उठाव करुन 'स्थानिकत्वा'च्या मुद्द्याचा आग्रह धरावा... त्यातूनच, संपूर्ण भारताचा 'एक देश' म्हणून 'सर्वांगीण व पर्यावरणपूरक' असा विकास होईल आणि विस्कळीत होऊ पहाणारी भारतीय-संघराज्याची संरचना पुन्हा मजबूत होईल.**

**हे स्थानिकत्वाचं धोरण, सध्याच्या 'जागतिक-तापमानवाढी'च्या महासंकटाच्या पार्श्वभूमीवर निसर्ग-पर्यावरणस्नेही तर आहेच; शिवाय, आपले राष्ट्रपिता म. गांधी यांनी 'हिंद स्वराज'मध्ये मांडलेल्या लोकहितकारी संकल्पनेनुसार देखील आहे, हे विशेषत्वाने येथे नमूद केले पाहिजे.**

२) आणि तसेच, शहरं-उपनगरांतून प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे जास्तीतजास्त फक्त, ''एक दुकान, एक मकान'' यासारखं 'संपत्तीचं पुनर्वाटप' करण्याचं समाजवादी राजकीय-धोरण राबवा आणि त्यातून, आपल्याच महाराष्ट्रात 'जगण्याची कोंडी' झालेल्या कसबी-होतकरु, उद्यमशील-सुशिक्षित मराठी तरुणतरुणींना आपले 'संसार आणि उद्योग-व्यवसाय' नव्याने फुलवण्याची संधि मिळू द्या....

...सुदैवाने, १९७८-७९सालच्या ४४व्या घटनादुरुस्तीनुसार आता, 'संपत्तीचा अधिकार', हा घटनात्मक 'मूलभूत अधिकार' (Fundamental Right) राहिलेला नसून; तो आता केवळ, एक कायदेशीर हक्क (Legal Right) बनलाय...'' अतिरिक्त संपत्तीचं न्याय्य व यथार्थ पुनर्वाटप होऊन 'समतावादी-समरस समाज' उभारणी करण्यातला एक मोठा घटनात्मक-अडसर, केव्हाचाच दूर झालाय''...तसंही, आपल्या 'भारतीय-अध्यात्मा'त ''त्येन त्यक्तेन भुंजीथः'', ही आदर्श-संकल्पना असून आपले राजेमहाराजे देखील प्रसंगोपात्त अतिरिक्त संपत्तीचे गोरगरीब जनतेला मुक्तहस्ते दान करायचे; म्हणजेच, खरेखुरे 'हिंदुत्ववादी' असाल तर, वरील धोरणाला पाठिंबा द्याल व ते राबवाल...आणि, खोटे वा भोंदू 'हिंदुत्ववादी' असाल, तर स्व. इंदिरा गांधींनी आणीबाणीच्या काळात राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'समाजवादी' शब्दाचा अंतर्भाव केल्या घटनेला, 'बाबासाहेबां'च्या नावाचा गैरवापर करुन, कडवा 'विरोध' कराल... कारण, भांडवली-व्यवस्थेतून 'संपत्तीचं अतिरेकी केंद्रिकरण होऊन अमानुष स्वरुपाच्या 'आर्थिक-विषमते'चा सर्वत्र नंगानाच सुरु असताना; ''संपत्तीच्या पुनर्वाटपा''खेरीज जगात कुठेही 'समता' (Common OR Shared Prosperity) येऊ शकेल? म्हणूनच, 'समतेचा संदेश' देणारा हा महामानव, कशाचा उद्गाता असू शकतो, ''भांडवली-व्यवस्थेचा की, समाजवादी समाजरचनेचा?''...हे शेंबडं पोरही खात्रीने सांगेल!

**३८९ जणांच्या संविधान-सभेतल्या तत्कालीन उजव्या-विचारसरणीच्या धेंडांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, राज्यघटनेच्या प्रस्तावनेत** (Preamble) **'समाजवादी' शब्द घालण्यापासून रोखलं होतं... अशा ज्या अनेक मोठ्या त्रुटी राज्यघटनेत राहून गेल्या व ज्यामुळे, १००हून अधिक घटना-दुरुस्त्या आपल्याला वेळोवेळी कराव्या लागल्या (जेव्हा, आपल्यापेक्षा १६१ वर्ष जुनी असूनही अमेरिकन राज्यघटनेत आजवर आपल्या एक चतुर्थांश; म्हणजे, जेमतेम २७ घटना-दुरुस्त्या झालेल्या आहेत); त्या घटनात्मक त्रुटी वा दोष, हे संविधान-सभेत बहुसंख्याक असलेल्या उजव्या-शक्तिंच्या प्रतिगामी-प्रभावामुळेच होत्या व आहेत...अन्यथा, 'समतेचा संदेश' देणारा महामानव, भांडवलशाहीप्रधान अमेरिकन-राज्यघटनेसारखा ''संपत्तीच्या अधिकाराला, मूलभूत-अधिकार म्हणून स्वप्नातही कधि स्वेच्छेने मान्यता देऊ शकला असता?''** ...या सगळ्या त्रुटी-दोषांवरचा अक्सीर इलाज म्हणूनच, घटनेतल्या एकमात्र अशा ३६८व्या घटनादुरुस्तीच्या सगळ्यात महत्त्वाच्या कलमासाठी, राज्यघटनेचा २०वा भाग समर्पित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, **''राज्यघटना-दुरुस्तीची तरतूद, ही एकप्रकारे राज्यघटनेचं अस्तित्व कायम राखण्याची वा तिचं संरक्षण करण्याची तरतूदच होय'' ...याच संदर्भात, अमेरिकेचे ख्यातनाम तिसरे अध्यक्ष थॉमस जेफरसन म्हणाले होते की, ''प्रत्येक पिढी, ही एक स्वतंत्र राष्ट्र असते** ('Every Generation is a Nation'') **व त्या त्या पिढीला विचारपूर्वक स्वतःचं भविष्य ठरविणारी राज्यघटना ठरवण्याचा मौलिक-मूलभूत अधिकार आहे!''**

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

(संयुक्त-महाराष्ट्रानंतर 'स्वायत्त-महाराष्ट्र'...राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र'...शिवछत्रपतीराष्ट्र!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

(बाय द् वे, गोदी-मिडीयातून ही बातमी दिसली का तुम्हाला...???)

# मॅडम, तुम्हाला मनापासून सलाम!

**''मुलांनो, महामानवांचा आदर्श घेतला पाहिजे... आदर्श कुणाचा घ्यावा? शिवाजीसारख्या महामानवाचा घ्यावा!''**

कार्यक्रमात प्रमुख वक्ते बोलतात आणि काही मुलं सभागृहाबाहेर पडतात. थोड्या वेळाने झुंडच कॉलेजमध्ये येते. शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख झाला, असा हल्लागुला सुरू होतो. त्या झुंडीसमोर एक प्राध्यापिका उभी राहते आणि त्यांना समजावून सांगते. ती संदर्भ देते कॉ. गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता?' या प्रसिद्ध पुस्तकाचा. झुंड ऐकत नाही. ती राडा करते. प्राचार्य माफी मागतात. स्टाफ माफी मागतो; पण ही प्राध्यापिका माफी मागायला नकार देते. झुंड तिच्या अंगावर धावून येते. तिला 'जय श्रीराम' म्हणण्यासाठी दमदाटी करते. ती बधत नाही. पोलिसात तक्रार होते. पोलीस अधिकारी FIR दाखल करण्याची धमकी देतो. संस्थेला सांगतो की तुम्ही मॅडमवर कारवाई करा. मॅडमची गाडी फोडली जाते. पाठलाग केला जातो. संस्था प्राध्यापिकेची बदली करते. प्राध्यापिका ती स्वीकारते; पण, माफी मागत नाही. ती उच्च न्यायालयात जाते. लढते. अनेक महिने जातात आणि अखेरीस न्यायालय त्यांच्याविरुद्ध कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढतं. कोर्ट पोलिसांना खडसावतं. ''ही कसली लोकशाही?'' असा संतप्त सवाल कोर्ट विचारतं. पोलीस अधिकाऱ्याने संस्थेला दिलेलं पत्र मागे घ्यायला लावतं. या प्राध्यापिकेला न्याय मिळतो.

केवळ एका पुस्तकाचा संदर्भ दिला म्हणून इतकं रामायण घडतं ! या झुंडशाहीच्या विरोधात लढणाऱ्या मॅडमचं नाव आहे प्रा. मृणालिनी आहेर. ज्या शिक्षण संस्थेत हे घडलं ती रयत शिक्षण संस्था. यशवंत कॉलेज, पाचवड, सातारा इथं हे घडलं.

सातारा पुरोगामी चळवळीसाठी प्रसिद्ध. रयत शिक्षण संस्था कर्मवीर भाऊराव पाटलांची. अध्यक्ष कोण तर शरद पवार ! संदर्भ कोणता तर कॉ. पानसरेंचा...शिवाजी कोण होता, या प्रसिद्ध पुस्तकाचा.

याच पानसरेंची हत्या होते आणि त्यांचा संदर्भ दिल्याबद्दल एका प्राध्यापिकेला छळाला सामोरं जावं लागतं. वर्षभर कोर्टाची पायरी चढायला लागते ! केवळ दुर्दैवी आहे हे !

प्रा. आहेर यांची रवींद्र पोखरकर यांनी मुलाखत घेतली आहे. जरूर पहा. त्यात त्या म्हणाल्या, ''मी माफी मागितली असती तर कॉ. पानसरेंचा अपमान ठरला असता.'' ते ऐकताना माझ्या डोळ्यात पाणी आलं. प्रा. मृणालिनी आहेर मॅडम,

तुम्हाला मनापासून सलाम !

येत्या १० ऑगस्टला आहेर मॅडमचा सत्कार आहे पुण्यात. सलोखा संपर्क गटाने हा सन्मान कार्यक्रम आयोजित केला आहे. मूळ घटना १० ऑगस्टलाच घडली होती. ऑगस्ट क्रांतीच्या पार्श्वभूमीवर या सन्मानाला विशेष अर्थ आहे. ज्यांचा संदर्भ दिला त्या कॉ. पानसरे यांचा वारसा पुढे नेणाऱ्या प्रा. मेघा पानसरे यांच्या हस्तेच हा सन्मान होणार आहे, हा काव्यात्म न्याय आहे !

अशी काही माणसं असतात म्हणून विचार टिकतो. हा महाराष्ट्र या परिवर्तनवादी परंपरेच्या वटवृक्षावर उभा आहे, याचं भान आपण ठेवूया.

*-श्रीरंजन आवटे*

# डॉक्टर : सिस्टिमचा व्हिक्टीम




सह्याद्री हॉस्पिटल्स, १९९५ मध्ये पुणेस्थित डॉक्टर चारुदत्त आपटे आणि सदानंद बापट यांनी स्थापन केले. नंतर त्यांचा विस्तार होत गेला. आजघडीला ११ हॉस्पिटल्स, १३०० खाटा आणि २५०० वैद्यकीय प्रोफेशनल तिथे काम करतात. मध्यंतरी त्याची मालकी, 'एव्हरस्टोन कॅपिटल'कडे गेली. एव्हरस्टोनने सह्याद्रीमधील आपली मालकी २०२२ मध्ये कॅनडाच्या Ontario Teachers' Pension फंडाला २५०० कोटी रुपयांना विकली. (याचा अन्वयार्थ: तुम्ही सह्याद्रीमध्ये वैद्यकीय उपचार घेऊन जे पैसे भरलेत किंवा भराल, ते पैसे कॅनडातील शिक्षकांचे पेन्शन देण्यासाठी अंशतः वापरले जात होते)

आता, Ontario पेन्शन फंडाने आपली मालकी मणिपाल हॉस्पिटल्सला ६८०० कोटी रुपयांना विकली आहे. म्हणजे Ontario ने तीन वर्षांत, १५० टक्के भांडवली नफा कमावला. (अन्वयार्थ: याचा आपण आजारी पडून ॲडमिट झालो, पैसे भरले किंवा भविष्यात भरणार आहोत त्याच्याशी संबंध आहे.)

वित्तवर्ष-२०२५ मध्ये, सह्याद्रीचा ठोकळ नफा फक्त २१० कोट रुपये आहे. अशा नफा देणाऱ्या सह्याद्री विकत घेण्यासाठी, मणिपालने ६८०० कोटी रुपये मोजले. भारतातील वैद्यकीय क्षेत्रात हा सर्वात महागडा सौदा मानला जात आहे. मणिपाल हे भरलेले पैसे कोणाकडून वसूल करणार? अर्थात सह्याद्रीत ट्रीटमेंटसाठी येणाऱ्या तुमच्या आमच्याकडून. मणिपाल हॉस्पिटल्सने फक्त सह्याद्री नाही विकत घेतलेले. गेल्या काही वर्षांत AMRI, Columbia -sia, Vikram अशा अनेक हॉस्पिटल्स चेन मणिपाल हॉस्पिटल्सने आपल्या खिशात टाकल्या आहेत. सध्या मणिपालकडे १२,००० खाटा जमल्या आहेत.

आपल्याला वाटेल, मणिपाल हॉस्पिटल्सकडे गडगंज पैसे दिसतात. तर तसे नाहीये. सिंगापूर सरकारचा Sovereign Wealth Fund Temasek आणि अमेरिकेतील टेक्सासस्थित एक मोठा प्रायव्हेट इक्विटी फंड TPG, हे दोन्ही मणिपाल हॉस्पिटल्सला भांडवल पुरवत आहेत. Temasek मधून सिंगापूर सरकार, सिंगापूरच्या नागरिकांचे कल्याणकारी कार्यक्रम राबवते. TPG अमेरिकन श्रीमंतांची घरे भरते. आपण पेशंट म्हणून सह्याद्रीमध्ये भरणाऱ्या फियांचा याच्याशी काय संबंध आहे का? विचार तर करा! मणिपाल हॉस्पिटल्सची एवढी तगमग कशासाठी चालली आहे; तर, मणिपाल हॉस्पिटल्सचा IPO येऊ घातला आहे. त्या IPO मध्ये जास्त प्रिमियम लावायचा आहे. खझज मध्ये ऑफर फॉर सेलमधून मणिपाल हॉस्पिटल्सचे ओरिजनल प्रवर्तक आपले ओरिजनल भांडवल विकणार असतील आणि भरपूर भांडवली नफा खिशात घालू शकतील.

सह्याद्री हॉस्पिटल तेच आहे, तेच असणार आहे. आपल्याला माहित पण नसेल की, गेल्या काही वर्षांत सह्याद्रीचे किती मालक बदलले. बदल जाचू लागतील, ज्यावेळी त्याच वैद्यकीय ट्रीटमेंटसाठी ज्यावेळी आपल्याला काही पटीने पैसे भरायला सांगितले जाईल. आपल्याला वाटते डॉक्टर जास्त पैसे घेऊ लागले आहेत, डॉक्टर माजलेत. तो फक्त छोटा भाग झाला. डॉक्टर स्वतः सिस्टिमचे व्हिक्टीम होत आहेत. मक्तेदार कॉर्पोरेट, वित्त-भांडवलाला अधिकाधिक नफ्याच्या रक्ताची चटक लागली आहे, ही खरी स्टोरी आहे.

मणिपाल आणि सह्याद्री हॉस्पिटल्स ही अपवादात्मक स्टोरी नाहीये. देशात काही मूठभर कॉर्पोरेट हॉस्पिटलचा घोडा उधळल्याप्रमाणे, मोठ्या प्रमाणावर छोटी-मध्यम आकाराची हॉस्पिटल्स विकत घेत सुटले आहेत. कॉर्पोरेट हॉस्पिटल, चेन स्पर्धेमध्ये टिकू शकत नाहीत; म्हणून, देशातील किमान सहाशे छोटी-मध्यम आकाराची हॉस्पिटल्स बंद करण्यात आली आहेत. जमलं तर माहिती घ्या. अकॅडेमिक ज्ञान वाढवण्यासाठी नाही; तर, हे आपल्या जीवनमरणाचे प्रश्न आहेत म्हणून.

अजून एक... मी माझ्या पोस्टमध्ये वित्त-भांडवल, वित्त-भांडवल म्हणत ठणाणा करत असतोय. Ontario, Temasek, TPG हे जागतिक वित्त-भांडवलशाहीमधील खेळाडू आहेत. मक्तेदारीकरण आणि वित्त-भांडवलाचा जैवसंबंध आहे, एवढेच लक्षात ठेवूया... अजून दुसरे, हे जे काय घडतंय, त्यात शासन, कायदा कोठे आहे? केलाय विचार? तुम्हा-आम्हाला कशात गुंतवून ठेवलंय? केलाय विचार?

*....संजीव चांदोरकर*






गुरुंकडून जे मिळत नाही,
ते अन्यत्रही मिळत नाही.
गुरुकृपेने माणसाला निःसंशय
सर्व काही प्राप्त होऊ शकते.













# अल्गॉरिदम्स आणि गिग–वर्कर्स...

समजा, मुंबईतल्या अंधेरी वेस्टमधल्या एका मुलीनं, लोखंडवालामधल्या इटालियन रेस्टॉरंटमधून झोमॅटोवर पास्ता मागवला; तर, अल्गॉरिदम्स त्या भागातला डिलिव्हरी–बॉय शोधायला लागतात. समजा, रामदयाल, कन्हैय्यालाल, प्रेमकुमार आणि अरबाज अली असे चौघंजण तिथे जवळच आहेत... आता, त्या चौघांपैकी कोणाकडे ऑर्डर जाईल, हे अनेक गोष्टींवर ठरतं. उदा. कामगाराचं नेमकं ठिकाण, त्याचं रेस्टॉरंटपर्यंतचं नेमकं अंतर, त्याचा डिलीव्हरीचा सर्वसाधारण वेग, तो कामगार किती लवकर वस्तू पोहोचवतो, त्याची हिस्ट्री, कस्टमर्सनी त्याला दिलेलं रेटिंग इ. या आणि अशा गोष्टींचा अभ्यास करुन, काही सेकंदात अल्गॉरिदम्स निर्णय घेतात आणि त्यातल्या एकाला मोबाईलवर मेसेज जातो.

**दर काही आठवड्यांनंतर, मॅनेजर्स या डेटाचा अभ्यास करुन, अल्गॉरिदम्सना नवीन नियम शिकवतात. ग्राहकांना चांगल्यात चांगला अनुभव मिळावा यासाठी, हे नियम काम करतात. वाहन बुकिंग असो, खाद्यपदार्थांची डिलिव्हरी असो किंवा इ–कॉमर्सचे व्यवहार, ग्राहक हा राजा असतो. काहीवेळा नवीन नियमांमुळे डिलिव्हरीचं काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनावर परिणाम होतो, मग ते रागावून संप करतात. हे बदल त्यांचं वेतन कमी करण्यासाठी केलेले नसतात; पण, कंपनीला तोटा मान्य नसतो आणि ग्राहकांना प्राधान्य असतं. मग, ''कोणीतरी'' त्यासाठी किंमत मोजावीच लागते...**

**हे ''कोणीतरी'' म्हणजे कामगार.**

आपली खरेदी करणं, खाणं, विक्री करणं, दिवसभरातलं वावरणं, हे तंत्रज्ञानामुळे आमुलाग्र बदललं आहे. स्विगी, झोमॅटो, ॲमेझॉन, उबेर अशा ॲप्समुळे आधुनिक जीवन सुसह्य केल्याचा भास होतो. त्यातून आपला वेळ वाचतो. अनेकांना रोजगार मिळतो आणि अचानक इच्छा झालेला खाद्यपदार्थ मिळण्यापासून, अचानक घरातली संपलेली वस्तू हातात येऊन ग्राहकांना दिलासा मिळतो.

पण, या डिजिटल जगामागे एक अदृश्य जग आहे. ते तात्पुरत्या, असंघटित कामगारांचं जग, जागतिक सत्ताकेंद्रांच्या दडपशाहीला निमूट बळी पडत चाललेलं आहे. सुविधांना बळी पडत जाणाऱ्या ग्राहकांना, या जगाबद्दल संपूर्ण अज्ञान आहे.

''ओटीपी प्लीज'' हे वंदना वासुदेवन यांचं, अभ्यासपूर्ण पुस्तक, इ–कॉमर्सच्या दुनियेतल्या दक्षिण आशियातल्या अशा गिग–वर्कर्सच्या कहाण्या आपल्यासमोर मांडतं. टेक कंपन्यांचा कारभार, त्यांची धोरणं इथपासून, कामगारांची मानसिकता इथपर्यंत या जगाचा धांडोळा यात घेतलेला आढळतो.

विशेष म्हणजे, काफ्कानं मांडलेल्या तत्वज्ञानाशी सत्ताकेंद्र आणि सामान्य माणूस यातला संघर्ष लेखिकेनं उलगडून दाखवला आहे. लेखिकेच्या शब्दात सांगायचं तर :

''फ्रँझ काफ्कानं प्रागमध्ये १९२०च्या सुमारास आपलं लेखन केलं. अस्तित्ववादाच्या तत्वज्ञानावर आधारित त्याचं लिखाण, किर्केगार्ड आणि नित्शेच्या विचारानं प्रभावित झालेलं होतं. काफ्काच्या दृष्टिकोनातून, प्रत्येकजण आपली उपेक्षा करणाऱ्या आणि सतत आपल्याविरोधात ठाकलेल्या जगात संघर्ष करत असतो. हा संघर्ष कधीच संपत नाही; पण, तो निराशाजनक विचारांच्या पार्श्वभूमीवर सातत्यानं करत रहायला हवा. त्याच्या उपहासगर्भ शोकांतिका, या आधुनिक औद्योगिक जगात पुराणकथांचं काम करतात. अनियंत्रित सत्ता असलेल्या व्यवस्था आणि त्यात अडकलेल्या व्यक्ती, यांच्यातलं नातं त्याच्या कथा दाखवतात.

आज तात्पुरती कामं करणारे कामगार आणि मोबाईलफोनवर असलेली ॲप्स नियंत्रित करणारे अल्गॉरिदम्स यांच्यातलं नातं, शंभर वर्षं होऊन गेल्यानंतरही, काफ्काच्या कथांमधून सांकेतिकपणे दिसतं. आज या कामगारांच्या प्रत्येक कृतीचं, ज्या माणसांना ते पहातही नाहीत, त्यांच्याकडून मूल्यमापन केलं जातं. जे मूल्यमापन करण्याचे नियम त्या कामगारांना ठाऊकही नसतात. यातला क्रूर विनोद म्हणजे, काफ्का हे खरोखर एका सॉफ्टवेअरचं नाव आहे, जे दरक्षणी डेटा गोळा करुन त्यावर प्रक्रिया करतं आणि बिग डेटाचं विश्लेषण करायला कंपन्यांना मदत करतं.

**अल्गॉरिदम्स ही गणितातली समस्या टप्प्याटप्प्यानं सोडवण्याची पध्दत आहे. स्मार्टफोन्स आणि इंटरनेटच्या**




**युगाआधी, हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेला पर्शियन विद्वान मुहम्मद इब्न मुसल अल–ख्वारिझ्मी यानं ती शोधली होती. अल्गॉरिदम हा शब्द खरं तर त्याच्या नावातल्या शेवटच्या शब्दांचा लॅटिन अपभ्रंश आहे.**

प्लॅटफॉर्म्सच्या दृष्टिकोनातून अल्गॉरिदम्स हे नियम, संकेत आणि डेटा याद्वारे प्लॅटफॉर्म्सच्या कामावर नियंत्रण ठेवतात आणि प्रत्येक टप्प्यावर साधकबाधक निर्णय घेतात. तिथे काम करणाऱ्या टेक्नोक्रॅटसशिवाय, त्यात ओतलेलं लॉजिक कोणालाच ठाऊक नसतं.

कामगारांच्या बाबतीत अल्गॉरिदमचं प्रमुख काम हे, ग्राहकांना हवी असलेली सर्व्हिस उत्कृष्टपणे कोण पार पाडू शकेल, तो कामगार शोधणं हे असतं. रेस्टॉरंट किंवा किराणा मालाची ग्राहकाची ऑर्डर, कमीतकमी वेळेत उचलून पोहोचवू शकणारा सर्वात जवळ असलेला कामगार कोणता, ते अल्गॉरिदम्स शोधतात.

**''अल्गॉरिदम्सच्या दृष्टिकोनातून पोहोचवायची वस्तू स्विकारुन, ग्राहकापर्यंत पोहोचवण्यात पहिला आणि शेवटचा असे दोन टप्पे असतात. पहिल्या टप्प्यात, डिलीव्हरी करणारा, एखाद्या रेस्टॉरंटमधून किंवा दुकानातून पॅकेज घेण्याची ऑर्डर स्विकारतो. रेस्टॉरंटमध्ये पोहोचायचे त्याला पैसे मिळत नाहीत. त्यानं ऑर्डर असलेली वस्तू स्वीकारल्यानंतर, ग्राहकाकडे निघाल्यानंतर त्याला किती पैसे मिळणार याचं गणित सुरु होतं.**

अल्गॉरिदम्स हे, त्या कामगाराच्या मार्गातला पहिला मैल हा, शेवटच्या मैलापेक्षा छोटा असेल याची काळजी घेणारे बनवलेले असतात. म्हणजे, रेस्टॉरंटच्या सर्वात जवळ असलेला डिलिव्हरी करणारा माणूस निवडला जाईल अशी ती रचना असते. मात्र, गर्दीच्या वेळात जर, डिलीव्हरी करणारा कामगार जवळपास सापडत नसेल तर, ॲप जरा दूरवर असलेला कामगार शोधतात.

स्विगी आणि झोमॅटोत काम केलेल्या राजेश सिंग यांनी या ॲपचं लॉजिक काय आहे, हे शोधायचा प्रयत्न केला आणि ही ॲप्स वयस्कर कामगारांबाबत भेदभाव करतात हे दिसून आलं. हे उदाहरण या पुस्तकात आहे.

राजेश सिंग म्हणतात, **''सुरुवातीच्या काळात कंपनी तुम्हाला खूप पळायला लावते. तुम्हाला खूप ऑर्डर्स मिळतात. आजूबाजूला पन्नासजण असतील तर, नवीन कामगाराचाच फोन वाजतो. मग तुम्हाला छान वाटतं. तुम्ही बारा, तेरा, चौदा तास काम करतात. ऑर्डर्स घेत रहाता... रेस्टॉरंटमागून ग्राहकांपर्यंत वाहन चालवत रहाता. त्यातून प्रकृतीवर अर्थातच परिणाम होतो. माझं वजन या प्रकारात खूप घटलं. पण मग, नंतर काही काळानंतर तितकेच किंवा त्यापेक्षा जास्त तास काम करुन, आठवड्याला पैसे मात्र कमी (आधी २०,००० मिळत असतील तर ते १६ हजार किंवा १० हजार इथपर्यंत खाली येत गेले.) मिळायला लागल्याचं लक्षात आलं. मला पूर्वीइतक्या ऑर्डर्स मिळत नव्हत्या.''**

राजेश सिंगसारख्या असंख्य गिग–वर्कर्सची समस्या हीच आहे, ती म्हणजे, त्यांच्या रोजच्या जगण्यात त्यांना समजतही नाही, असं खूप जास्त काहीतरी घडत असतं. सर्वज्ञ, सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान असलेला अल्गॉरिदम अदृश्य असला तरी, अंतर्यामी म्हणजे सर्व जाणणारा असतो. कामगारांना या डिजिटल अंतर्यामी ॲप्सचं कामकाज कसं चालतं ते माहितीही नसतं.

ग्राहक म्हणून या कामगारांच्या दुनियेचा विचार आपण केलेला नसतोच; पण, जागतिक पातळीवरही असंघटित कामगारांच्या समस्यांमध्ये ही अजून एक दुर्लक्षित, उपेक्षित बाजू आहे.

*....निलांबरी जोशी*

# मराठीचा 'वाली' आणि तिसऱ्या भाषेचे पुरस्कर्ते!

माझ्या माहितीप्रमाणे आपण मराठीत सर्रास वापरत असलेल्या 'वाली' ह्या शब्दाचं मूळ पर्शिअन आहे... 'वली'!

(पाहा: ''या वली मोहम्मद!'')

ज्या शब्दाचा मूळ अर्थ आहे 'रक्षणकर्ता' किंवा 'मार्गदर्शक'!

तर, भाषा ही अशी प्रवाही आणि जिवंत असते...

मराठीचे 'वाली' वगैरे शोधण्याचा नाद 'सोडण्यात' आपण मुळातच खूप उशीर केलाय.

महाराष्ट्र नावाच्या राज्याला 'स्वतःचा' एखादा 'बरा' नेताही नाही, हे वास्तव आहे.

आपापले 'साहेब' घेऊन अंगावर येऊ नका, त्यांच्या फक्त 'बेडरूमचं' महिन्याचं लाईट बिल हे तुमच्या वार्षिक बजेटपेक्षा जास्त आहे... (ज्यांचं नाही, ते स्वतःच एक प्रकारचे होऊ घातलेले साहेब आहेत... त्यांना आमची आणि आम्हाला त्यांची शष्प किंमत नाही.)

हे मान्य असल्यास पुढे वाचा!

मी आज जे काही स्पष्ट विचार करतो, वाचू, लिहू, बोलू शकतो, ते केवळ 'मराठी' भाषेमुळे!

मी अस्खलित इंग्रजीतही मुलाखती देतो, व्याख्यानं करतो, लिहितो, ह्याचं कारण मी माझ्या 'मातृभाषे'त सुस्पष्ट विचार करू शकतो.

**भाग एक –**

'भाषा' हा मुळातच राजकीय विषय आहे.

पूर्वीच्या काळी अत्यंत महागडं तंत्रज्ञान मानल्या जाणाऱ्या टांकसाळीत आपली भाषा धातूवर छापून/कोरून घेणे हे 'राजेपणाचं' लक्षण होतं, जे जगातल्या मोजक्या राज्यकर्त्यांप्रमाणे 'छत्रपती शिवाजी महाराजांनी' साध्य केलं होतं.

हा देश १९४७ साली स्वतंत्र झाला तो विविध संस्थानिकांच्या अंमलाखालील एकत्र केलेला (!) भूभाग म्हणून.

त्यानंतर १९५६ साली ह्या देशात 'भाषावार प्रांतरचना' झाली.

आपल्या लेखी इतिहास म्हणजे सोळावं शतक (महाराज) आणि एकोणिसावं शतक (इंग्रज) एवढाच असतो.

ह्या मध्ये आणि ह्यानंतर जे झालं, त्याची शक्यतो 'Whats-pp' वर माहिती उपलब्ध नसते आणि म्हणून त्यातलं बरंचसं आपल्याला माहिती असायचं काहीच कारण नाही.

तरीही...

१०६ माणसं (हुशार, लढवय्ये, प्रामाणिक, मान्यवर, कडवट इ.) भाषावार प्रांतरचना होत असताना 'आमची भाषा आणि आमचं राज्य' ह्या कल्पनेसाठी मारले गेले.

त्यांना 'सरकार' नामक निर्दयी संस्थेने मारले, आणि त्यावेळी काँग्रेसचं वर्चस्व होतं (म्हणजे काँग्रेस बाद).

त्यानंतर 'उठाव लुंगी, बजाव पुंगी'वाले कडवट नेते 'मराठीचा' कैवार घेऊन आले. 'वाचा आणि शांत बसा' म्हणत त्यांनी आपल्याला खडबडून जागं केलं. झोपेत तोंडावर पाणी फेकल्यागत आपण जागं झालोदेखील

पण नंतर 'मंदिर वही बनायेंगे'च्या नादात आपण 'शांत' बसत नसलो तरी, स्वतःची भाषाच बोला-वाचायला विसरू लागलो (म्हणजे शिवसेना बाद).

त्या शिवसेनेला बळ देणारी आणि मोठं करणारी तेव्हाची 'सरकार' नामक यंत्रणा जी, कॉ. कृष्णा देसाईंना खपवून मोकळी झाली (म्हणजे महा-राज्यात बाळसं धरू लागलेली कम्युनिस्ट पार्टी बाद).

'साध्या' आणि 'गुलाबी' राष्ट्रवादीचा कोणत्याही अस्मितेशी काहीच संबंध नाही (मुळातच बाद).

हा एवढा इतिहास पुरेसा झाला.

आज रोजीच्या भाबड्या वर्तमानात अघोरी क्रिया करून, बळी देऊन मंत्रीपदाची आणि धन-धान्याची आस भागवणारे नेते असताना, आपण आपल्या भाषेसाठी 'वाली' शोधणं हा मुळातच एक किळसवाणा मूर्खपणा आहे.

वातावरण निर्मिती खलास ! (पु.ल. वाचले असतील तर




हा 'पंच' कळेल).

**भाग दोन –**

मुद्दे:

१) तुम्ही डॉ. दीपक पवार यांचं भाषण/मनोगत ऐकलं आहे का?

नसेल, तर आधी ते ऐका, पोस्ट वाचण्याची आवश्यकता नाही.

२) 'मराठी हृदयसम्राट' राज ठाकरे दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांना भेटले होते. तुम्हाला जे काही म्हणायचं होतं ते 'तेव्हा' म्हणून त्याचा पाठपुरावा करण्यात उरली-सुरली ऊर्जा खर्च करू शकला असतात, भंपक पत्रकार परिषद घेऊन आम्हाला आणि मुख्याध्यापकांना सल्ले देण्याचं ह्या विषयात प्रॅक्टीकली काही कौतुक नाही.

३) 'केंद्रात मंत्रीपद' आणि 'बॉलिवूडमध्ये काम' हे ज्यांच्या जन्माचं 'इतिकर्तव्य' आहे, अशा नेत्यांकडून आणि अभिनेत्यांकडून अपेक्षा ठेवणं म्हणजे, आपला स्वतःचाच अपमान आहे.

४) आज दोन्ही शिवसेनांच्या मेळाव्यांमध्ये 'मराठीचा' मुद्दा केंद्रस्थानी नव्हता. 'मराठी'चा नसता तरी ठीक, हिंदीच्या सक्तीचा तर अजिबातच नव्हता. राष्ट्रवादी आणि काँग्रेस कडून तर अपेक्षाच नाहीत. पण, तुमचे 'स्वर्ग आणि नरक' फक्त धर्माधिष्ठितच आहेत का? आमच्या भाषेला, भावनांना तुम्ही मूठमाती दिली आहे का? असेल तर आश्चर्य नाही, पण प्रामाणिक कन्फेशन हवंय !

५) महाराष्ट्रातील 'कोणत्याही' पक्षातील मोठ्या नेत्यांच्या मुलांना 'मराठी अंकलिपी' ही संकल्पना म्हणून जरी माहिती असेल, तर मी माझं अकाउंट डिलिट करून उर्वरित आयुष्य गोव्यात 'पाव' विकेन!

६) महाराष्ट्रातील 'कोणत्याही' पक्षातील मोठ्या नेत्यांच्या आणि त्यांच्या मुलांच्या आजूबाजूला असणाऱ्या, मराठी धड वाचू/बोलू 'न' शकणाऱ्या १०० लोकांची यादी जर आपण सहज बनवू शकलात, तर तुमचं आम्हाला कणभरही कौतुक नाही, कारण ते फार सोपं काम आहे.

७) ह्या देशाचे गृहमंत्री आज एका कार्यक्रमात म्हणाले, ''इंग्रजी बोलणाऱ्यांना लाज वाटेल असे दिवस लवकरच येतील.'' आपल्या राज्यातील कर्तुत्ववान NRI मंडळींना हे वाक्य मान्य आहे का?

८) ''तीन भाषांची सक्ती आहे, हिंदीची नाही'' आणि ''तिसरी भाषा शिकण्यात काय हरकत आहे?'' असं म्हणणाऱ्या आपल्या मुख्यमंत्र्यांना अपेक्षित तिसरी भाषा 'मल्याळम', 'तमिळ', 'उर्दू' किंवा 'ओडिया' आहे का?

आणि असल्यास, ती शिकवणारे शिक्षक आपल्याकडे आहेत का ?

९) ''दैनंदिन जीवनात संवाद साधताना हिंदी भाषेचा वापर अधिक होतो म्हणून विद्यार्थी आणि पालकांच्या मागणीनुसार शाळांत हिंदी विषय शिकवला जाईल'' असं म्हणणाऱ्या आपल्या शिक्षणमंत्र्यांना दोन अतिशय बाळबोध प्रश्न:

अ) आपण महाराष्ट्राच्या कोणत्या शहरात राहता?

ब) विद्यार्थी आणि पालकांच्या 'मागणीनुसार' शाळा चालणार असतील; तर, तुमचे सगळे प्रशासकीय अधिकारी आणि अनुभवी कर्मचारी आम्ही का पोसायचे?

उद्या 'भानामती' शिकवा अशी मागणी झाल्यास तुम्ही मान्य करणार का? (तुमच्या 'रायगड'च्या नेत्यांना एकदा विचारून घ्या, नाहीतर आपसांत भांडाल.)

आणि आपणा सर्वांना अगदी शेवटचा प्रश्न:

१०) आपल्याला लाज वाटत नाही का?

'भाषेचं राजकारण करू नका' म्हणणाऱ्यांनो... 'भीती आणि भाषा' हेच तुमच्या राजकारणाचं केंद्रस्थान राहिलंय...

भाषेचं कोलीत 'समविचारी' (माजी) 'हिंदू जननायकांच्या' हाती देताना, 'Maharashtra Special Public Security Act' आणू बघताय आणि तिकडे आमचं लक्ष आहेच.

उद्या भाषेसाठीच काय, तोंडच्या घासासाठी सुद्धा 'रस्त्यावर उतरणं' सोडाच आम्ही 'बोलू'पण शकणार नाही ही आमची खरी भीती आहे, आणि त्या भीतीला आज आणि कायम आम्ही 'मराठीतच' वाचा फोडू !

''तुम्ही ज्याची वाट लावू इच्छिता, आता आम्ही त्याचीच वाट पाहतोय !''

***– वरुण सुखराज***

LateNightThoughts मराठी

# १९ जुलै : बँक राष्ट्रीयीकरण दिवस!

१९ जुलै–१९६९ रोजी, इंदिरा गांधींनी तत्कालीन १४ खासगी बँकांचे राष्ट्रीयकरण केले. त्याला आता ५६ वर्षे झालीत.

हे खरे आहे की, सार्वजनिक क्षेत्राची भलामण करण्याचे हे युग राहिलेले नाही. तीच गोष्ट सार्वजनिक बँकांची. सार्वजनिक बँका म्हणजे, लाखो कोटींची थकीत कर्जे. ही थकीत कर्जे का झाली तर, भ्रष्टाचारामुळे. भ्रष्टाचार का होऊ शकला? कारण, बँकांची मालकी सरकारी असल्यामुळे; मग, उपाय काय? तर, या बँकांची सार्वजनिक मालकी बदलून, खाजगी क्षेत्राकडे देणे, अशी उथळ मांडणी व चर्चा हेतुपूर्वक घडवली गेली. ती प्रयत्नपूर्वक रुजवली गेली. (खाजगी बँकांमधील घोटाळ्याबद्दल चुप्पी!)

**१९६९च्या आधी स्टेट बँक सोडली; तर, सर्व बँकांवर त्या काळातील मोठ्या औद्योगिक घराण्यांची मालकी होती. कल्पना करा राष्ट्रीयीकरण झाले नसते, बँकिंग पूर्णपणे खाजगी मालकीच्या क्षेत्रात राहिले असते तर, काय झाले असते?**

त्यातून मोठी औद्योगिक घराणी अजून मोठी झाली असती, त्यांचा राजकारणावरील प्रभाव आज आहे, त्यापेक्षा काही पटींनी वाढला असता. शेअर मार्केट/रिअल इस्टेट ही क्षेत्रे, आज दिसतात त्यापेक्षा काही पटींनी सूज आल्यासारखी वाढली असती. आज आपल्या देशात, जी आर्थिक विषमता आपण अनुभवत आहोत, ती काहीपटींनी अधिक धारदार असती.

अशा चर्चांमध्ये काही मूलभूत सत्यांकडे डोळेझाक होते, ज्याचा संबंध तुम्ही डाव्या विचारांचे आहात की, उजव्या याच्याशी नाही.

कोणत्याही देशात बँकिंग उद्योग त्या देशाच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी असतो. युनिक/एकमेवाद्वितिय काम करत असतो. रक्ताभिसरणाचे, अर्थव्यवस्था रसरसलेली ठेवण्याचे, अर्थव्यवस्थेला हवीतशी दिशा देण्याचे...

बँकिंग क्षेत्रात सार्वजनिक मालकीच्या बँकांचे प्राबल्य असावे की नसावे? हा आयडियॉलॉजिकल मुद्दा नाहीये. आपल्या देशाची अर्थव्यवस्था आज ज्या अवस्थेत आहे आणि महत्त्वाचे म्हणजे, आजच्या वेगाने बदलणाऱ्या जागतिक संदर्भात, देशात सार्वजनिक बँका, बँकिंग क्षेत्राच्या केंद्रस्थानी असणे हे सर्वांच्या हिताचे आहे.

**सार्वजनिक बँकांच्या कारभारात सुधारणेला वाव आहे की नाही? तर आहे. (जसा तो खाजगी बँकिंग/वित्त क्षेत्रामध्येदेखील आहे) सार्वजनिक चर्चा त्या विषयावर झाल्या पाहिजेत. ना सार्वजनिक बँकांचे खाजगीकरण झाले पाहिजे यावर.**

१९६९च्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची उपलब्धी फक्त आर्थिक नाही; तर, सामाजिक व राजकीय आहे. आपल्या देशाचे अर्धेमुर्धे सामाजिक/राजकीय स्थैर्य जे काही आहे, त्यात सार्वजनिक बँकांचे खूप मोठे योगदान आहे. या उपलब्धी सार्वजनिक व्यासपीठांवर पुढे आणल्या पाहिजेत.

चीनच्या नेत्रदीपक आर्थिक प्रगतीमध्ये, चीनमधील महाकाय सार्वजनिक बँकानी खूप मोठे योगदान दिले आहे. जागतिक क्रमवारीत चार चिनी सार्वजनिक मालकीच्या बँका आहेत, या गोष्टी आवर्जून सांगितल्या पाहिजेत.

**२००८मधील अमेरिकेत सुरु झालेल्या सबप्राइम अरिष्टाच्या झळा, भारताला फारशा लागल्या नाहीत, त्याचे महत्त्वाचे कारण, देशात सार्वजनिक बँकांचे प्राबल्य हे होते, हे सांगितले पाहिजे. अशी अरिष्टे नजीकच्या काळातदेखील येऊ शकतात.**

देशाच्या सार्वजनिक बँका (आणि खरेतर अनेक स्ट्रॅटेजिक क्षेत्रात सार्वजनिक उपक्रम) प्रभुत्वस्थानी असणे, राष्ट्राची राजकीय सार्वभौमता वज्रलेपी करण्यासाठी पूर्वअट आहे.

वरील मांडणी पुस्तकी नव-उदारमतवादी तत्त्वज्ञानाच्या सिलॅबसमध्ये कधीच नसणार आहे. प्रमेये घोकंपट्टी करणारे शाळकरी आहेत ते सर्वजण. प्रत्येक ठोस परिस्थितीला ठोस सोल्युशन हा मंत्र हवा. ''ॲप्लिकेशन ऑफ माईंड'' हवे, नेहमीच.

१९६९ सालातील बँक राष्ट्रीयीकरणाचा अजेंडा अर्धवट सोडून देण्यात आला आहे, तो पूर्णत्वाला नेण्याची गरज आहे. हे शेवटचे वाक्य तरुण पिढीसाठी

*....संजीव चांदोरकर*

# एक लढवय्या माणूस आणि देव

गार्डिनर हॅरिस हा नामांकित पत्रकार आहे. न्यूयॉर्क टाइम्ससाठी तो काम करतो. पूर्वी वॉल स्ट्रीट जर्नलमध्ये होता. तिथेच त्याने जॉन्सन अँड जॉन्सन या कंपनीची बदमाषगिरी उघड करणाऱ्या बातम्या केल्या. त्याचे बालपण जॉन्सनच्या मुख्यालयाच्या जवळ असणाऱ्या प्रिन्स्टनमध्ये गेले. तो म्हणतो, कंपनी भरपूर श्रीमंत. शिवाय समाजाच्या उपयोगी पडणारी औषधे तयार करते. म्हणून लोकांना तिच्याबद्दल खूपच आदर वगैरे होता.

वॉल स्ट्रीट जर्नलमध्ये त्याला औषधी कंपन्या हाच बीट मिळाला. जॉन्सन कंपनीच्या चांगल्या स्टोरीज करता येतील असे त्याला वाटले. पण प्रत्यक्षात उलटेच झाले. कंपनी भयंकर लबाड आहे असे त्याच्या लक्षात आले. १९९० मध्ये एड्सचा उद्रेक झाला. तेव्हा आफ्रिकेत जेनेरिक अर्थात स्वस्त औषधे विकायला हवीत असे ठरले. सर्व कंपन्या राजी झाल्या. एकट्या जॉन्सन अँड जॉन्सनने मात्र विरोध केला.

नवजात अर्भकांना एसिडिटीवर दिल्या जाणाऱ्या प्रॉपल्सिडमुळे हृदयाचे ठोके अनियमित होतात. मुले मरण्याचा धोका असतो. कंपनीच्या सर्व क्लिनिकल ट्रायलमध्ये हे दिसले होते. तरीही तिने हे औषध विकायचे सोडले नाही.

जॉन्सन बेबी पावडरचे प्रकरण तर कुख्यात आहे. यामधल्या घटकांमुळे कर्करोग होऊ शकतो असे आढळले होते. बऱ्याच तक्रारी, खटले इत्यादी झाले. पण, कंपनी हटत नव्हती. कहर म्हणजे अमेरिकी औषध प्रशासन अर्थात



एफडीएचे वर्तनदेखील अत्यंत बदमाष व भ्रष्ट होते. एफडीएने लोकांच्या तक्रारींना उत्तरेच दिली नाही. शेवटी जॉन्सन कोर्टात पहिली केस हरली. तेव्हा 'एफडीए'ने उत्तर दिले. पण ते असे की, बेबी पावडरमध्ये कोणताही हानिकारक घटक नाही. कंपनीच्या जवळपास प्रत्येक उत्पादनांमध्ये अशाच भानगडी आहेत.

गार्डिनरने आपल्या या लढाईवर काही पुस्तके लिहिली आहेत. ''द डार्क सिक्रेट्स ऑफ जॉन्सन अँड जॉन्सन'' हे अलिकडेच प्रसिध्द झाले आहे. त्या संदर्भात हिंदूच्या रविवार पुरवणीत त्याची मुलाखत प्रसिध्द झाली आहे.

गार्डिनर म्हणतो-या कंपनीच्या उत्पादनांमुळे एकट्या अमेरिकेत वीस लाख (होय, वीस लाख) लोक मेले असावेत, असा माझा अंदाज आहे.

या वीस लाख माणसे मारू शकणाऱ्या कंपनीच्या विरोधात तो लढला तरी कसा? तो अमेरिकेतल्या बड्या वृत्तपत्रांमध्ये होता हे खरे. तिथल्या लोकांचा थोडाफार पाठिंबा त्याला होता-असेल. पण जेव्हा 'एफडीए' (FDA) सारख्या यंत्रणा माती खातात आणि कंपन्या सांगून सवरून कायद्यांचे व माणसांचे खून पाडतात तेव्हा करणार काय?

गार्डिनर म्हणतो की, या असल्या लढाया इतक्या थकवणाऱ्या आणि अंधःकारमय असतात की तुम्हाला निराशाच यावी. हे पुस्तक लिहायलाच मला पाच वर्षे लागली. पण या काळात मी नियमितरीत्या चर्चमध्ये जात असे. ही लढाई लढत राहण्याची माझी उमेद टिकवून ठेवायला देवाने मदत करावी म्हणून मी प्रार्थना करीत असे. अन्यथा, कोणत्याही क्षणी तुम्ही निराशेत बुडून जाण्याचा धोका असतो.

एकूण, गार्डिनर स्वतःला सुपरमॅन वगैरे समजत नाही, हे यावरून कळतं. तो एक साधा, जिगरबाज व चिकाटीचा माणूस आहे. त्याला सलाम.

दरम्यान, या जॉन्सन छापाच्या कंपन्या अमेरिकेत अजून तरी देवाला विकत घेऊ शकत नाहीत हे एक बरं आहे... गार्डिनरसारखे लोक त्याच्यावर भरवसा टाकू शकतात..

भारतात अंदाजे काय स्थिती आहे?

*...राजेंद्र साठे, फेसबुकवर...*

# भविष्याचा वेध

आजपासून तब्बल ६० वर्षांपूर्वी, १९६४ साली न्यूयॉर्कमध्ये एक भव्य जागतिक प्रदर्शन (New York World's Fair) भरले होते. जगभरातून लोक भविष्यातील तंत्रज्ञानाची झलक पाहण्यासाठी आले होते. त्या काळात ना इंटरनेट होते, ना मोबाईल फोन, ना आजच्यासारखे कॉम्प्युटर. अशा वेळी, प्रसिद्ध विज्ञान कथा लेखक आणि भविष्यवेत्ता आर्थर सी. क्लार्क (Arthur C. Clarke) यांनी शांतपणे मंचावर उभे राहून पुढच्या १०० वर्षांचे चित्र जगासमोर मांडले. त्यांची भविष्यवाणी ऐकून तेव्हा लोकांना कदाचित ती एक मनोरंजक कल्पना वाटली असेल, पण आज मागे वळून पाहताना त्यांच्या दूरदृष्टीचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

आर्थर क्लार्क यांच्या भाषणाचा BBC ने केलेला व्हिडिओ इंटरनेटवर उपलब्ध आहे. क्लार्क यांनी काय भविष्यवाणी केली होती, त्यापैकी काय खरं ठरलं आहे आणि भविष्यात काय खरं ठरू शकतं?

**क्लार्क यांची अचंबित करणारी भविष्यवाणी**

क्लार्क यांनी जगाला सांगितले की भविष्यात तंत्रज्ञान आपले जीवन कसे बदलेल. त्यांनी मांडलेले काही प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे होते:

१. जागतिक दळणवळण (Global Communication) : ते म्हणाले की, भविष्यात उपग्रहांच्या (Satellites) मदतीने आपण जगातील कोणत्याही व्यक्तीशी त्वरित संपर्क साधू शकू. जणू काही संपूर्ण जग एक 'जागतिक खेडे' (Global Village) बनेल, जिथे अंतर आणि वेळ यांचे महत्त्व कमी होईल.

२. कामाचे स्वरूप बदलेल (The End of Commute) : क्लार्क यांचा एक सर्वात प्रसिद्ध अंदाज होता की, ''माणसे भविष्यात कामासाठी प्रवास करणार नाहीत; तर, ते संवाद साधतील (Men will no longer commute, they will communicate).'' त्यांना असे म्हणायचे होते की तंत्रज्ञानामुळे लोकांना घरबसल्या काम करणे शक्य होईल आणि शहरांमधील गर्दी कमी होईल.

३. दूरस्थ शस्त्रक्रिया (Tele surgery) : त्यांनी कल्पना केली होती की, एक दिवस असा येईल, जेव्हा एक निष्णात सर्जन हजारो मैल दूर बसून रोबोटिक हातांच्या साहाय्याने रुग्णावर शस्त्रक्रिया करू शकेल.

४. कॉम्प्युटरचे स्वरूप (Personal Computers) : त्या काळात मोठमोठ्या खोल्या व्यापणारे कॉम्प्युटर पाहून त्यांनी म्हटले होते की, भविष्यात कॉम्प्युटर इतके लहान आणि शक्तिशाली होतील की ते प्रत्येक घरात असतील. प्रत्येकजण आपल्या घरातल्या 'कन्सोल'वरून बँकेची कामं, खरेदी आणि शिक्षण घेऊ शकेल.

**आज कोणती भविष्यवाणी खरी ठरली आहे?**

क्लार्क यांच्या दूरदृष्टीची ताकद आज आपल्याला स्पष्ट दिसते.

इंटरनेट आणि स्मार्टफोन : त्यांची 'जागतिक खेडे' ही कल्पना म्हणजेच आजचे इंटरनेट. उपग्रहांमुळे आणि फायबर ऑप्टिक केबल्समुळे आज आपण व्हिडिओ कॉलद्वारे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात बसलेल्या व्यक्तीला पाहू आणि बोलू शकतो. आपला स्मार्टफोन हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

रिमोट वर्क (Work From Home) : कोविड-१९ महामारीच्या काळात संपूर्ण जगाने 'वर्क फ्रॉम होम'चे महत्त्व अनुभवले. क्लार्क यांनी ६० वर्षांपूर्वी पाहिलेले स्वप्न कोट्यवधी लोकांसाठी वास्तव बनले. आज अनेक कंपन्या




कायमस्वरूपी 'रिमोट वर्क' मॉडेल स्वीकारत आहेत.

**टेलिमेडिसिन आणि रोबोटिक सर्जरी : आज रोबोटिक सिस्टीमच्या मदतीने डॉक्टर अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अचूकपणे करत आहेत. टेलिमेडिसिनमुळे दुर्गम भागातील रुग्णांना शहरांमधील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे शक्य झाले आहे.**

**आपल्या घरातले कॉम्प्युटर : आज लॅपटॉप, टॅब्लेट आणि डेस्कटॉप प्रत्येक घरात पोहोचले आहेत. आपण ऑनलाइन बँकिंग, शॉपिंग, शिक्षण आणि मनोरंजन या सगळ्या गोष्टी क्लार्क यांनी वर्णन केलेल्या 'कन्सोल'वरूनच करत आहोत.**

**भविष्यात साकार होऊ शकणारी स्वप्ने (आणि काही धाडसी कल्पना!)**

क्लार्क यांच्या काही कल्पना अजून पूर्णत्वास यायच्या आहेत, पण त्या दिशेने जगाची वाटचाल सुरू आहे. यातील काही कल्पना तर विज्ञान कथांनाही मागे टाकतील अशा आहेत.

अंतराळ वसाहती आणि सस्पेंडेड ॲनिमेशन (Space Colonization and Suspended Animation) : क्लार्क यांनी चंद्र आणि मंगळावर मानवी वस्तीची कल्पना केली होती. आज SpaceX आणि NASA यांसारख्या संस्था त्या दिशेने काम करत आहेत. इतकेच नाही, तर लांबच्या अंतराळ प्रवासासाठी त्यांनी 'सस्पेंडेड ॲनिमेशन' (Suspended Animation) ची कल्पना मांडली होती. यात अंतराळवीरांना एका दीर्घ निद्रावस्थेत ठेवून त्यांचा प्रवास घडवला जाईल, जेणेकरून त्यांचे वय वाढणार नाही आणि काही दशकं प्रवास करून आपण अंतराळातील इतर जीव शोधू शकू. त्यांच्याशी संपर्क करू शकू !

अजैविक उत्क्रांती (Inorganic Evolution) : ही त्यांची सर्वात धाडसी आणि विचार करायला लावणारी कल्पना होती. त्यांच्या मते, मानव हा उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा नाही. भविष्यात यंत्रमानव (Robots) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) स्वतःला सुधारत, शिकत इतके प्रगत होतील की ते मानवी जीवनाला मागे टाकून 'अजैविक जीवसृष्टी' म्हणून उत्क्रांत होतील. ते मानवाचे उत्तराधिकारी असतील.

मेंदू आणि स्मृतींमध्ये हस्तक्षेप (Brain and Memory Manipulation) : क्लार्क यांनी मानवी मेंदूमध्ये थेट तंत्रज्ञानाच्या मदतीने बदल करण्याची कल्पना केली. यात दोन प्रमुख गोष्टी होत्या:

– स्मृती पुसून टाकणे (Memory Erasing) : एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील दुःखद किंवा क्लेशदायक आठवणी निवडकपणे काढून टाकण्याची क्षमता.

– थेट ज्ञान (Instant Learning) : मेंदूमध्ये थेट माहिती किंवा कौशल्ये 'अपलोड' करणे. म्हणजे, कोणतीही भाषा, वाद्य वाजवणे किंवा एखादे कौशल्य काही क्षणांत शिकता येणे, जसे 'द मॅट्रिक्स' चित्रपटात दाखवले आहे. आज 'न्यूरालिंक' सारखे प्रकल्प या दिशेने टाकलेले पहिले, पण महत्त्वाचे पाऊल आहे.

3D प्रिंटिंग आणि रेप्लिकेटर्स (3D Printing/ Replicators) : क्लार्क यांनी 'स्टार ट्रेक' मालिकेप्रमाणे वस्तू तयार करणाऱ्या 'रेप्लिकेटर' मशीनची कल्पना केली होती. आजचे 3D प्रिंटर हे त्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. भविष्यात आपण घरबसल्या अन्न, कपडे किंवा आवश्यक वस्तू 'प्रिंट' करू शकू.

आर्थर सी. क्लार्क हे केवळ एक विज्ञान कथा लेखक नव्हते; तर, ते एक द्रष्टे विचारवंत होते. त्यांनी तंत्रज्ञानाच्या मूलभूत सिद्धांतांना समजून घेतले आणि त्याआधारे भविष्याचा तर्कशुद्ध वेध घेतला. त्यांची १९६४ सालची भविष्यवाणी ही केवळ कल्पना नव्हती; तर, ती विज्ञानाच्या प्रगतीचा एक संभाव्य नकाशाच त्यांनी तयार केला होता.

त्यांनी दाखवलेल्या भविष्यात आज आपण जगत आहोत आणि त्यांच्या काही अधिक धाडसी कल्पनांच्या जगात आपल्या पुढील पिढ्या जगतील. आता प्रश्न हा आहे की, आजपासून १०० वर्षांनंतरचे जग कसे असेल? ... न जाणो आजपासून आजपासून १०० वर्षांनी तुम्ही सांगितलेल्या कल्पना खऱ्या झालेल्या असतील !

***सलिल सुधाकर चौधरी***
नेटभेट ई-लर्निंग सोल्युशन्स
मातृभाषेतून शिकूया, प्रगती करूया !

# डॉ. नरेंद्र जाधव यांचा 'ब्राह्मणी' वापर...

त्रिभाषा सक्तीला कडाडून विरोध झाल्यानंतर राज्य शासनाने संबंधित निर्णय मागे घेतला. मात्र, त्यासंदर्भात अन्य योजना आखण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव समिती स्थापन करण्याचे घोषित केल्यामुळे मराठीप्रेमींमध्ये पुन्हा एकवार संतापाची लाट उसळलीय...या सगळ्या पार्श्वभूमीवर ज्यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमली आहे त्या डॉ. नरेंद्र जाधव यांची काय भूमिका आहे, हे अद्याप समोर आलेले नव्हते. मात्र, नुकतीच पत्रकार प्रशांत कदम यांच्या 'वाईड अँगल' युट्यूब चॅनेलला नरेंद्र जाधवांनी हिंदी सक्ती, माशेलकर समितीचा यापूर्वीचा अहवाल आणि मराठी भाषेच्या अस्मितेचा मुद्दा, या सगळ्याच मुद्द्यांवर आपली भूमिका मांडलीय...

BaiManus ने या मुलाखतीचा संपादित अंश प्रसिद्ध केला आहे...मुलाखती मधील काही ठळक विधाने खालीलप्रमाणे,

''माशेलकरांच्या अहवालाची जी भूमिका आहे ती मला १०० टक्के अमान्य आहे''

''अद्याप समिती गठीतसुद्धा झाली नाही, तरीसुद्धा आंदोलन कशासाठी?''

'' 'श्यामची आई'पेक्षा माझं 'आमचा बाप आणि आम्ही' हे पुस्तक जास्त विकलं गेलंय''

'' सर्व वंचित समाजतल्या युवा-युवतींसाठी आदर्श कोण असेल तर, ते डॉ. नरेंद्र जाधव''

''मी काय करणार, हे टिकोजीराव नाही ठरवणार''

(प्रशांत कदमने घेतलेल्या मूळ मुलाखतीची लिंक कॉमेंटमधे)

''मी काय करणार हे टिकोजीराव नाही ठरवणार'', ते असं म्हणाले असले तरी...मुद्दा हा आहे की, नरेंद्र जाधव यांच्यावर मराठी माणसाचा विश्वास का नाही ?

'श्यामची आई'पेक्षा माझं 'आमचा बाप आणि आम्ही' हे पुस्तक जास्त विकलं गेलंय'

...याचे सत्य काय आहे?

''सर्व वंचित समाजतल्या युवा-युवतींसाठी आदर्श कोण असेल तर, ते डॉ.नरेंद्र जाधव'', ...याचे खरे वास्तव काय आहे?

यावर वेगळं काही लिहीण्याची खरंतरं गरज नाही... नरेंद्र जाधव यांच्यावर मराठी माणूस विश्वास ठेवायला, का तयार नाही?

...जाधव यांचे नैतिक आणि बोद्धिक चारित्र्य काय आहे?

....यासंदर्भाने, नरेंद्र जाधव यांचं यथार्थ मूल्यमापन करत, त्यांच्या 'भांडवली व चातुर्वर्ण्य' व्यवस्था-स्खलनशीलतेचं माप, अचूक त्यांच्याच झोळीत टाकणारा हा, २००७ सालीच लिहीला गेलेला, सद्यस्थितीतील अत्यंत औचित्यपूर्ण लेख... वाचकांसाठी येथे पुन्हा सादर करीत आहोत.

नियोजन आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर पुण्याच्या बालगंधर्वमध्ये डॉ. नरेंद जाधव यांची अरुण नुलकर यांनी नुकतीच मुलाखत घेतली. या मुलाखतीच्या एका प्रश्नामध्ये, ''आपण पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काय सांगाल?''

...असे विचारले असता, जाधव म्हणाले, **''मी प्रथम पुणे विद्यापीठाचे कुलगुरुपद का स्विकारले...याबद्दल सांगतो. पुणे विद्यापीठाची ऑफर मी अफगाणिस्तानमधील वर्षाकाठी दीड कोटी रुपयाची नोकरी सोडून, वर्षाकाठी सहा लाख रुपयांची नोकरी स्विकारली. कारण, ज्या पुणे शहराने पेशवाईमध्ये माझ्या पुर्वजांना अत्यंत छळले, अपमानित केले, त्यांच्या कंबरेला खराटा व गळ्यात मडके बांधले...त्याच शहरामध्ये त्या पुणे शहराचा 'पोप' म्हणून मी आलो. हा माझ्यासाठी 'पोएटिक जस्टीस' (काव्यगत न्याय) आहे!''**

जाधव यांच्या या विधानाने फ्रान्स जळत असताना फिडल वाजवत असलेल्या सम्राटाची आठवण येते. कारण, स्वातंत्र्याच्या साठ वर्षानंतरही या देशातील दलित-आदिवासी समाज खऱ्याखुऱ्या न्यायासाठी खैरलांजीसारखी जीवन-मरणाची लढाई लढत असताना डॉ. जाधव, बहुजन समाजाचे खऱ्या न्यायावरील लक्ष हटवण्यासाठी तर...ही शब्दांची बनवाबनवी, हा शब्दच्छल करत नाहीत ना? केवळ शब्दांच्या बनवाबनवीने उपेक्षित समाजाला न्याय मिळत नसतो. संत तुकाराम महाराज म्हणतात.

***वांझेने दाविले । गरवार लक्षण***
***चिरगुटे घालून । वाथयाला***
***तेविशब्दज्ञांनी । करिती चावटी***
***ज्ञान पोटासाठी । विकुनिया***
***बोलाचिच कढी । बोलाचाच भात***
***जेवूनिया तृप्त । कोण झाला***

याप्रमाणे डॉ. जाधव यांचे बोलणे काहीही असले; तरी, त्यांचं प्रत्यक्ष वर्तन-व्यवहार काय आहे? ज्या काव्यगत न्यायासाठी ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाले व आता नियोजन आयोगाचे सदस्य झाले आहेत...त्या काव्यगत न्यायाने दलित, आदिवासी व शेतकऱ्यांचे कोणते न्याय प्रश्न सोडविलेत व कोणते प्रश्न सोडविणार आहेत? विद्यापीठात जाधव आल्याबरोबर त्यांनी प्रभारी कुलगुरू रत्नाकर गायकवाड यांनी घेतलेले अनेक निर्णय रद्द केले. विद्यापीठातल्या विविध आसनांवरील बहुजन समाजातील बुद्धिमंतांची निवड रद्द केली. एस.सी., एस. टी. प्राध्यापकांचा गायकवाड यांनी भरलेला अनुशेषही चौकशीच्या भोवऱ्यात टाकून रत्नाकर गायकवाडांची बदनामी केली. गायकवाड यांनी घेतलेले निर्णय खरोखरच चुकीचे असतील, नियमबाह्य असतील तर ते रद्द केले, तर ते योग्यच आहे. हे कोणताही साधा विवेक असणारी व्यक्ती समजू शकते. मात्र स्वतःचा अहंकार जोपासण्यासाठीच, स्वतःचे मीपण दाखवण्यासाठीच यांनी गायकवाडांचे निर्णय रद्द केले. नंतर हेच निर्णय स्वतःचे म्हणून मिरवले. परंतु हे करत असताना आपल्याच माणसाची आपण बदनामी करत आहोत, मानहानी करत आहोत, याचे भान डॉ. जाधव यांनी ठेवले नाही. कुलगुरूपदाचा चार्ज घेतल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी म्हणवणारे डॉ. जाधव पुण्याच्या गणपती-उत्सवाला राजकीय नेत्याप्रमाणे हजेरी लावत...ज्या पेशवाईने दलितांचा अमानुष छळ केला; त्याच पेशवाईचे प्रतीक असणारी पगडी घालून 'गणपती हे बुद्धीचे वैभव आहे', असे म्हणाले. यावेळी डॉ. जाधवांना हा 'काव्यगत न्याय' का सुचला नाही? कुलगुरुपदाच्या काळात डॉ. जाधव कुलगुरू कमी व राजकारणी म्हणून शहरात जास्त वावरले. आंबेडकर-अनुयायी म्हणत सेना, भाजप यांच्या कार्यक्रमालाही उपस्थित राहिले. त्यांनी स्वतःला ब्राह्मणी वर्तमानपत्रांत सतत चर्चेत ठेवले. ह्या वर्तमानपत्रांनीही त्यांच्या फुटकळ कार्यक्रमांनाही पहिल्या पानावर छापले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ''जेव्हा ब्राह्मणी वर्तमानपत्र मला प्रसिद्धी देतात. तेव्हा मला माझ्या निर्णयात काही तरी चूक असल्याचे जाणवते व जेव्हा ते मला शिव्या घालतात तेव्हा मी बरोबर असतो.'' ह्या मापाने डॉ. जाधव यांना तपासले असता डॉ. जाधव हे कुणी जगातले एकमेव विद्वान आहेत व त्यांचा ब्राह्मणांना व ब्राह्मणी वर्तमानपत्रांना आत्यंतिक अभिमान आहे, म्हणून त्यांनी डॉ. जाधव यांना डोक्यावर घेतले असे नाही, तर कार्ल मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे, ''प्रस्थापित व्यवस्था निर्धोक चालू रहावी, यासाठी ती व्यवस्था, समाजातील स्वार्थी व्यक्तींना व वर्गाला स्वतःमध्ये सामील करून घेत असते व शोषित समाजामध्ये बौद्धिक गोंधळ निर्माण करण्यासाठी अशा व्यक्तींना व वर्गाला मोठ्या खुबीने वापरत असते.'' म्हणून डॉ. नरेंद्र जाधव यांना वापरुन घेण्यासाठीच, ब्राह्मणी वर्तमानपत्रे त्यांना अवास्तव प्रसिद्धी देत आहेत.

### डॉ. जाधव यांना ब्राह्मणी व्यवस्था कशी वापरुन घेत आहे...???

१९९० च्या नंतर जगभर जागतिकीकरणाचे वारे सुरु झाले आणि विविध देशांच्या अर्थव्यवस्था बदलावयास सुरुवात झाली. ह्या जागतिकीकरणाने माणसाच्या जगण्याचेच संदर्भ बदलवले. त्यामध्ये भारतामध्ये हजारो वर्षांपासून शिक्षण, आरोग्य, रोजगार व मानवी हक्क यापासून उपेक्षित असलेला बहुजन समाज जागतिकीकरणामध्ये अधिकच उपेक्षित होऊ लागला. त्याचे अस्तित्व टिकवणे अशक्य होऊ लागले. त्याच जागतिकीकरणाच्या समर्थनार्थ डॉ. जाधव ब्राह्मणी छावणीच्या बाजूने उभे राहिले. जागतिकीकरणात अर्थव्यवस्था व बदललेल्या अर्थव्यवस्थेमुळे आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जातिव्यवस्था आपोआप नष्ट होईल, असे जाती-अंताचे अजब तर्कशास्त्र व आडाखे मांडू लागले. परंतु, **''अर्थव्यवस्था, हा जातीचा एकमेव आधार नाही; तर या देशात धर्म, धर्मांचे धर्मग्रंथ, त्या धर्माची प्रतीके व त्याचे तत्त्वज्ञान... हे जातीचे महत्त्वाचे आधार आहेत', असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. मात्र, यासंबंधी जाधव काहीच बोलत नाहीत. उलट जातीचा धार्मिक आधार असणाऱ्या हिंदुंच्या धार्मिक कार्यक्रमांना 'पेशवाईची पगडी' घालून उपस्थित राहतात. हिंदूधर्माचे व जातिव्यवस्थेचे प्रतीक असणारा गणपती स्वतःच्या घरात बसवतात... याला डॉ. जाधव यांची मानसिक-गुलामी समजायचे की, ब्राह्मणवाद्यांना खूष करण्याची चलाखी समजायचे?**

डॉ. जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारासंबंधी जे पुस्तक लिहिले आहे; त्यामधून डॉ. नरेंद्र जाधव, बाबासाहेबांना क्रांतिकारी अर्थशास्त्रज्ञ दाखवण्याऐवजी... बाबासाहेबांना जागतिकीकरणाचे समर्थक, मुक्त-अर्थव्यवस्था व भांडवली-अर्थव्यवस्था यांचे समर्थक; तसेच, सरकार आज जी आर्थिक-निति वापरत आहे, तिचं व्यवस्था बाबासाहेबांना कशी अपेक्षित वा अभिप्रेत होती, अशी बाबासाहेबांची विकृत-प्रतिगामी प्रतिमा उभी करतात. ब्राह्मणी नव-हिंदुत्ववादी विचारवंत ...पृष्ठ क्र. १५ वर

## डॉ. नरेंद्र जाधव यांचा 'ब्राह्मणी' वापर... ...पृष्ठ क्र. १४ वरुन

स. ह. देशपांडे म्हणतात, आतापर्यंत व्यापारी वर्गानेच भारतीय समाजव्यवस्थेला हादरे दिले आहेत. म्हणून जागतिकीकरणातून जातीव्यवस्था कोलमडून पडेल. मग, स.ह. देशपांडे यांचे समर्थन जाधव करीत असतील; तर, जाधव आंबेडकरवादी की, नवहिंदुत्ववादी, असा प्रश्न निर्माण होतो. डॉ. आंबेडकरांचा लघू-जमीन धारणेच्या प्रश्नावरील निबंध, बाबासाहेबांनी सांगितलेले जातीचे अर्थशास्त्र व 'जमिनीचे राष्ट्रीयीकरण' यासंबंधी जाधव का बोलत नाहीत? कारण यासंबंधी बोलणे, ते ज्या ब्राह्मणी व्यवस्थेचे 'Ponsard Intellectual' आहेत, त्या व्यवस्थेला आवडणार नाही. जातीचे धार्मिक आधार व जातीचे अर्थशास्त्र दुर्लक्षित करुन, ब्राह्मणी-व्यवस्थेची मृत्यूघंटा असणाऱ्या 'निहिलेशन ऑफ कास्ट', या दस्तऐवजाला डॉ. जाधव कालबाह्य दाखविण्याची बौद्धिक चलाखी करीत आहेत. जाती व्यवस्थेला पुन्हा बळकटी देण्यासाठी धार्मिक व सांस्कृतिक आधार देत आहेत.

**डॉ. जाधव हे राज्यसत्तेचे बुद्धिमंत आहेत, जनतेचे नव्हे. जेव्हा शेतकरी-आत्महत्ये संदर्भात डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमली होती, तेव्हा जाधव यांनी 'डेटा मॅनिप्युलेट' करत शेतकऱ्यांनाच दोषी ठरवले होते. हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पत्रकार पी. साईनाथ यांनी सरकारने शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात नेमलेल्या एक सदस्य समितीच्या अहवालाच्या आधारेच स्पष्ट करुन दाखविले आहे.**

दुसरा महत्त्वाचा मुद्दा 'आम्ही आणि आमचा बाप' या 'डॉ. जाधव अँड फॅमिली' यांच्या सामूहिक आत्मकथनाचा... या पुस्तकामुळेच बाबासाहेबांचे नाव जगभर कसे गेले व हे कसे अभिजात साहित्य आहे...असे ते स्वतःच्याच तोंडून सांगत आहेत. प्रश्न, यासंबधीच्या खरेखोटेपणाचा नाही. खरा प्रश्न आहे, तो या आत्मकथनामधून दलितांच्या कोणत्या प्रश्नांची त्यांनी मांडणी केलीय? या आत्मकथनातून समाजाने कोणती प्रेरणा घ्यावी आणि ह्या आत्मकथनाचे साहित्यिक मूल्य काय आहे?

**या आत्मकथनासंबंधी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग म्हणतात की, 'डॉ. आंबेडकर किंवा भारताचे राष्ट्रपती डॉ. के आर नारायणन यांच्याप्रमाणेच डॉ. नरेंद्र जाधव यांचे आयुष्य ही सुद्धा बदलाची, असीम शौर्याची, उत्कर्षाची आणि आशेची कहाणी आहे. यामधून आपल्या देशातील लाखो-करोडो वंचित लोकांना नवे सुखासमाधानाचे जीवन जगण्यासाठी लढा देण्याचे स्फूरण मिळेल, याची खात्री आहे. डॉ. जाधव यांनी लिहिलेल्या आत्मकथनामधून आपल्याला सामाजिक आणि राजकीय दृष्टी प्राप्त होईल.**

पंतप्रधान म्हणतात त्याप्रमाणे, ही बदलाची कहाणी आहे... परंतु ती त्यांच्या व्यक्तिगत बदलाची आहे. ही असीम शौर्याची नव्हे तर असीम तडजोडीची कहाणी आहे. कारण जाधवांनी जे मिळवले आहे ते डॉ. आंबेडकरांप्रमाणे व्यवस्थेशी लढून नाही तर व्यवस्थेशी तडजोड करून व व्यवस्थेसाठी काम करून मिळवले आहे. ही कहाणी उत्कर्षाचीही आहे; परंतु, स्वतःच्या व्यक्तिगत उत्कर्षाची आहे...त्यामध्ये समाज, त्यांचे दुःख, त्यांचे प्रश्न व त्यांची मुक्ती याच्याशी बांधिलकी कुठेच दिसत नाही!

डॉ. आंबेडकरांना सोहनलाल शास्त्री यांनी, ''तुम्हाला जर देशाचे राष्ट्रपती बनवले तर, तुम्ही काय कराल?'' असा प्रश्न विचारला असता, बाबासाहेब म्हणाले, ''मला देशाचे राष्ट्रपती बनवले आणि त्याने जर माझ्या समाजाचा विकास होणार नसेल; तर, असे पद मी एकदा नव्हे, तर शंभरदा ठोकरुन देईन...अशा प्रकारची सामाजिक बांधिलकी असलेल्या बाबासाहेबांच्या जीवनातून दलितांना सामाजिक व राजकीय दृष्टी प्राप्त झालीय, ती नरेंद्र जाधव यांच्या आत्मकथनातून घेण्याची दलितांना गरज नाही... नव्हे, ती क्षमताच त्यामध्ये नाही.

तरीही ब्राह्मणवादी, या आत्मकथनाला 'दलित आत्मकथन' म्हणून अवास्तव महत्त्व देत आहेत. कारण 'तराळ-अंतराळ', 'मु.पो. देवाचे गोठणे', 'आयदान', 'बलुतं', 'आठवणीचे पक्षी', 'माझ्या जन्माची चित्तरकथा', या सारख्या आत्मकथनामधून जातीय वास्तवता, हिंदूधर्माचे बीभत्स रूप व त्याचा अमानुष वर्तन-व्यवहार...यामध्ये दलित समाज कसा होरपळत आहे, याचे वास्तव जगासमोर आणले आणि या वास्तवाला दडपण्यासाठीच डॉ. जाधव यांच्या आत्मकथनाला अवास्तव प्रसिद्धी दिली जात आहे, याची शंका येते. आपल्या मुलाला शिकून 'बाबासाहेब हो' म्हणणारा, या आत्मकथनामधला बाप आमचा आहे. मात्र, शिकूनसवरुन मोठा झाल्यावर समाजऋणाची परतफेड करण्याऐवजी, स्वतः च्या व्यक्तिगत प्रसिद्धीसाठी व फायद्यासाठी बाबासाहेबांच्या चळवळीची वैचारिक तोडफोड करणारा, ब्राह्मणी व भांडवली व्यवस्थेचे अर्थशास्त्र सांगणारा, ब्राह्मणी व्यवस्थेला खूष करण्यासाठी व कुलगुरूपदाला चिकटून राहण्यासाठी पेशवाईची पगडी घालून गणपतीची आरती करणारा आणि १९५६ साली बाबासाहेबांनी ज्या ३३ कोटी ब्राह्मणांचा देव्हारा फेकायला सांगितला, तोच देव्हारा आजही आपल्या घरात ठेवणारा व पुजणारा... तो जाधवांचा 'नरेंद्र' नावाचा मुलगा, आमचा होऊच शकत नाही.

...यासंबधी, जाधव यांची मुलगी अपूर्वा, याच आत्मकथनात म्हणते, ''माझा १६ वा वाढदिवस होता तेव्हाचा प्रसंग. सकाळी लगबगीने तयार होऊन मी प्रेझेंट गोळा करण्याच्या गडबडीत होते. पण आई-पप्पा मला आमच्या स्टडीरूममध्ये घेऊन गेले. तेथे आमच्या कुटुंबाचे देव मांडून ठेवण्यात आले होते. आजी-आजोबांनी १९५६ लाच बौद्ध धर्म स्विकारला. त्यावेळी खरंतर या देवांचे डॉ. आंबेडकरांच्या आदेशानुसार विसर्जन करायचे होते. सोना आजीला ते करवेना म्हणून खोटे-नाटे सांगून तिने ते देव लपवून ठेवले होते. तेच देव माझे पप्पा अमेरिकेला घेऊन आले होते आणि तेच देव टपोऱ्या डोळ्यांनी माझ्याकडे पहात होते. मी त्यांना मनोभावे नमस्कार केला व आशिर्वाद मागितले.''

यामध्ये, अडाणी सोना आजीने बाबासाहेबांच्या आदेशानुसार देव फेकून न देणे, आपण एकवेळ समजू शकतो. परंतु अर्थशास्त्रज्ञ, कुलगुरू आणि दलितांचे पोप समजणाऱ्या जाधवांनाही अजून का समजत नाही? का ते त्यांना समजून घेण्याची गरज वाटत नाही ?

याच मुलाखतीत डॉ. जाधव यांनी, आपण कुलगुरू असताना पंतप्रधान पुणे भेटीवर आले असता ''मी स्वतःसाठी काही न मागता पुण्याच्या डेक्कन कॉलेजसाठी पंतप्रधानांकडे ५ कोटी मागितले'', असे अभिमानाने सांगितले. परंतु शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायानुसार मदत नेहमी दुबळ्या समाजाला हवी असते, या न्यायाने ती मदत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पी.ई.एस. सोसायटीच्या व डेक्कनच्याच बाजूला असणाऱ्या पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या डॉ. आंबेडकर कॉलेजसाठी मागता आली असती. परंतु ती त्यांनी मागितली डेक्कन कॉलेजसाठी. यावरुन डॉ. जाधव यांना कोणत्या समूहाची शैक्षणिक काळजी आहे, हे लक्षात येते.

ते नियोजन आयोगाचे सदस्य झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या विविध समित्यांवर ४२ लोकांच्या नेमणुका केल्या. त्यामधील अर्ध्यापेक्षा जास्त एकट्या पुण्यामधील व एकाच ब्राह्मण जातीतील आहेत. यावरुन जाधव यांची आंबेडकरी चळवळीशी किती बांधिलकी आहे, ते लक्षात येते.

**गेल्या दोन वर्षांपूर्वी त्यांनी नाशिकच्या युवक-साहित्य संमेलनात ''जगातील सर्वच 'इझम' नालायक आहेत'', असे जाहीर करुन टाकले. त्यावर त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्याने त्यांना, 'तुमचे आंबेडकरीझम् व बुद्धीझम् याबाबत काय मत आहे?' असा प्रश्न विचारला...परंतु, त्याचे उत्तर देण्याची त्यांची हिंमत झाली नाही. म्हणून, त्यांनी अप्रत्यक्षपणे नथीतून तीर मारण्याचा प्रयत्न केला.**

खरे तर बाबासाहेबांनी तत्त्वज्ञानाच्या पातळीवर चळवळीचा विकास करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केला. परंतु बाबासाहेबांच्या पश्चात त्यांच्या उंचीचा, त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या विकासाला पुढे घेऊन जाणारा एकही प्रामाणिक बुद्धिजीवी निपजला नाही व त्यामुळेच आंबेडकरी-चळवळ एका आवर्तात सापडली... आणि, याचाच फायदा नरेंद्र जाधवांसारखे लोक घेत आहेत. ब्राह्मणवादी शोषण-व्यवस्थेच्या विरोधातील संघर्ष कमी करण्यासाठी 'एन्ड ऑफ आयडॉलॉजी'सारख्या अफवा पसरवत आहेत. बाबासाहेब हयात असतानाच जेव्हा शिकलेल्या लोकांनी त्यांना धोका दिला तेव्हा ते म्हणाले होते, 'मुझे इमानदार लोगोंकी जरुरत है, बुद्धीकी कमी मै भर दूँगा' दुर्दैवाने आज इमानदार लोकांची गरज मोठ्या प्रमाणात आहे. ह्या इमानदार लोकांनी, 'तत्त्वज्ञान संपले आहे' असे म्हणणाऱ्यापासून सावध राहत, संत तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे...

***अल्प असे ज्ञान परि । अंगी भलता ताठा अभिमान ।***
***तुका म्हणे त्यास गाढव लेखा । जेथे भेटेल तेथे ठोका ।।***

...असा व्यवहार केला पाहिजे; तरच, खरा न्याय मिळेल. कारण, आपल्या समाजाला आपल्यातील कुणी व्यक्ती एखाद्या मोठ्या पदावर नियुक्त झाला की, आभाळ ठेंगणे वाटायला लागते. तो समाजाचा देवदूत वाटायला लागतो. मात्र, आपल्या समाजातील माणूस मोठा झाला की, आपलेही भले होईल, हा विश्वास दलित समाज जेवढ्या लवकर त्यागेल तेवढ्या लवकर त्याला त्याच्या मुक्तीचा मार्ग सापडेल. मार्क्स म्हणतो, **''वर्ग बदलला की जाणिवा बदलतात... त्याप्रमाणे दलितांमध्ये आता वर्ग निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे... आणि, हे खैरलांजीमध्ये सामील असणाऱ्या अनेक दलित अधिकाऱ्यांनी दाखवून दिले आहे.'' म्हणून हा लेख केवळ एकट्या नरेंद्र जाधवांचे माप काढण्यासाठी मुळीच नाही. तर, या देशातील ब्राह्मणी-व्यवस्था, 'बहुजनांच्या मुक्ती-लढ्याला गुमराह' करण्यासाठी भविष्यात असे छोटे-मोठे हजारो 'जाधव' निर्माण करेल व करत आहे... त्या जाधवांना ओळखण्याची दृष्टी-अंतर्दृष्टी समाजाला यावी, यासाठीच हा लेखनप्रपंच!**

*...पूर्वप्रकाशन - २००७ (केशव वाघमारे)*



बुधवार मुंबई १६ जुलै २०२५

महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

## सुनावणी नको, सव्वा लाख डॉलर देतो

बंगळुरू : अमेरिकेतील सायबर सुरक्षेतील त्रुटीशी संबंधित एका प्रकरणाच्या चौकशीत नियमानुसार ३० दिवसांच्या आत माहिती न दिल्याबद्दल १,२५,००० डॉलरचा दंड भरण्याचे इन्फोसिस मॅक्कॅमिश सिस्टम्सने (आयएमएस) मान्य केले आहे. २०२३ मधील हे प्रकरण असून, सुनावणी न घेताच दंड भरून मिटविण्यासंबंधीचा करार कंपनीने अमेरिकेतील व्हेरमाउंट राज्याच्या वित्त नियामकीय विभागासोबत केला आहे. सायबर सुरक्षा त्रुटीची माहिती ग्राहकांनाही वेळेत न दिल्याचा कंपनीवर आरोप आहे.

ही आहे ‘असलियत’ तथाकथित ‘उदारमतवादी’ भांडवली-व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांची... जो शहाजोगपणे कामगार-कर्मचारीवर्गाने आठवड्याचे तब्बल ७० तास काम केले पाहिजे, असा क्रूर ‘भांडवली-शंखनाद’ करत होता! आपण सारी बावळट माणसं साधेभोळेपणाने नारायण मूर्ती, सुधा मूर्ती, सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन, नाना पाटेकर, लता मंगेशकर वगैरे एकेक रक्तपिपासू-निर्मम-शोषक भारतीय ‘भांडवली-व्यवस्थे’च्या (Vampire-State System) पालखीचे भोई असणाऱ्यांना फारच डोक्यावर घेऊन नाचतो! कधी आपण शहाणे होणार?

*...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



बित्तंबातमी!

## मराठी ही जगातील एकमेव निसर्ग-पर्यावरणस्नेही भाषा – राजन राजे

मुंबई :

धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत ती जगातील एकमेव निसर्ग-पर्यावरणस्नेही भाषा असल्याचा दावा केला आहे. मातृभाषेप्रतीच्या त्यागाचे आणि संवर्धनाचे आवाहन करत राजे यांनी आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय आणि सांस्कृतिक वास्तवावरही आपले मत व्यक्त केले. राजे म्हणाले की, राज्यातील हिंदीभाषिकांना भेदभावाचे वागणूक देण्याचे राजकीय कट महाराष्ट्रात आता उघडपणे दिसून येत असून, मराठी माणसाच्या हक्कांवर आघात होत आहे.

त्याचबरोबर राज्य सरकारने शाळांमध्ये हिंदी भाषेला तिसरी भाषा म्हणून जबरदस्तीने स्वीकारण्याचा निर्णय मराठीच्या विरोधात असल्याचा गंभीर आरोप केला. “हिंदी शिकायची असल्यास मुलं आपोआप शिकतील, शाळेत सक्ती करणे निंदनीय आहे,” असे ते म्हणाले.

मराठी संस्कृतीत पर्यावरणीय संस्कार आणि निसर्गाशी असलेले घनिष्ट नाते अधोरेखित करत राजे म्हणाले, “मराठी सण, जसे की नागपंचमी, तुळशी-विवाह, वटपौर्णिमा, बैलपोळा हे प्राणी आणि वनस्पतीशी निगडीत आहेत. ही संस्कृती पर्यावरणस्नेही असून मराठी भाषा त्याचा अभिन्न भाग आहे.” त्यामुळे आजच्या पर्यावरणीय संकटांच्या काळात मराठी भाषेची जागतिक पातळीवर दखल होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.


राजे यांनी पुढे म्हटले की, मराठी भाषेवर होणाऱ्या विविध भाषांच्या आक्रमणांमागील कारण समजून घेणे गरजेचे आहे. मुलांवर अभ्यासाचा ताण कमी करावा, आणि शिक्षणात गणित-विज्ञान यांसारख्या विषयांना अधिक लक्ष दिले पाहिजे.

मराठी भाषेचं बाजारपेठेतील महत्त्व घसरत चाललंय... पण, आपल्याला ही बाजारपेठेतील किंमत कशी वाढेल हे पाहणं अत्यंत गरजेचं असून, त्यासाठी भांडवली व्यवस्थेला हादरे द्यावे लागतील. हा प्रश्न फक्त हिंदीभाषिक म्हणून उत्तर-भारतीयांपुरता मर्यादित नाहीये; तर, गुजराती आणि मारवाडी यांच्या भांडवली-व्यवस्थेला हादरा देण्याचा सुद्धा आहे आणि म्हणूनच, अनेक गोष्टींसोबत कंत्राटी-कामगारपद्धतीचं उच्चाटन हे प्रामुख्याने व्हायला पाहिजे. देशासोबतच, प्रामुख्याने महाराष्ट्रासमोरील हा सगळ्यात मोठा प्रश्न आहे. या गुजराथी-भाषिकांच्या भांडवली व्यवस्थेला हादरे दिलेत, तरच तुमची मराठी भाषा आणि मराठी माणूस सुरक्षित राहील, नाहीतर त्याचं महाराष्ट्रातून उच्चाटन होईल. अनेक आंदोलनं करताना, पर्यावरणीय महासंकटाच्या संदर्भात आम्हाला सांगितलं जातं की, कोण कुठे जन्माला येतो हा अपघात असतो. कोण कोकणात जन्माला येतो तर, कोण आणखी कुठे जन्माला येतो; मग, आमच्या सगळ्यांचा महाराष्ट्रातला जन्मसुद्धा एकदाचा अपघात ठरवा आणि आम्हाला अरबी समुद्रात ढकला...नाहीतरी, आमच्या महापुरुषाचा-महानायकाचा पुतळा तुम्ही अरबी समुद्रात उभारत आहातच. मराठी तरुणतरुणींचे संसार आणि व्यवसाय फुलण्यासाठी (मुं. ठा. पु. रा. ना. म्हणजेच, मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक अन् नागपूर) शहरं मोकळी करुन घ्यावी लागतील.... आपल्याला नजिकच्या भविष्यात प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे फक्त “एक दुकान-एक मकान” अशी कडक धोरणं राबवावी लागतील...तरच आणि तरच महाराष्ट्रात मराठी माणसाचा बोलबाला होईल, मराठी भाषेला पुन्हा एकदा कायमस्वरुपी महत्त्व प्राप्त होईल....

*...राजन राजे*

मुंबईत जन्मलेला एक मराठी मुलगा, ज्याने कॉलेजमध्येही पाऊल न टाकता आपल्या मेहनतीच्या जोरावर आज भारतातील टेलिकॉम क्षेत्राचा महत्त्वाचा चेहरा बनला आहे – हे आहे मनोज तिरोडकर यांचं यशकथानक!

१९६४ साली मुंबईत जन्मलेले मनोज तिरोडकर यांनी मराठी शाळेतून शिक्षण घेतलं. कॉलेजमध्ये न जाता त्यांनी वयाच्या १७व्या वर्षी वडिलांच्या शिपिंग व्यवसायात पाऊल ठेवलं. मात्र त्यांचं मन वेगळं काही तरी करण्याच्या शोधात होतं. त्यांना दूरसंचार क्षेत्रात मोठी संधी दिसली आणि त्यांनी ‘ग्लोबल टेलिकॉम’ या नावाने व्यवसाय सुरू केला.




फॅक्स मशीनपासून सुरू झालेली ही वाटचाल पुढे वायरलेस न्टेना आणि टेलिकॉम टॉवर्सपर्यंत पोहोचली. त्यांच्या ‘ग्लोबल ग्रुप’ अंतर्गत GTL Ltd. आणि GTL Infra Ltd. या कंपन्या स्थापन झाल्या. आज GTL Infra ही भारतातील सर्वात मोठ्या टेलिकॉम टॉवर कंपन्यांपैकी एक आहे.

मनोज तिरोडकर यांनी भारतात पहिल्यांदाच टेलिकॉम टॉवर शेअरिंगचं मॉडेल आणलं, ज्यामुळे कंपन्यांचा खर्च कमी झाला आणि गावे-खेड्यांपर्यंत नेटवर्क पोहोचू लागलं. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानासाठीही त्यांचे विशेष योगदान आहे.

त्यांच्या यशाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली – ते ‘World Young Business Achiever Award' जिंकणारे पहिले भारतीय ठरले! ‘CII Young Entrepreneur' आणि ‘Telecom Man of the Year' असे अनेक पुरस्कारही त्यांच्या नावावर आहेत. फोर्ब्सच्या २०१०च्या श्रीमंत भारतीयांच्या यादीत त्यांचा ७४वा क्रमांक होता.

CSR क्षेत्रातही त्यांची समर्पित कामगिरी आहे. ‘ग्लोबल फाउंडेशन’च्या माध्यमातून ते ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य आणि दृष्टिहीनांसाठी काम करत आहेत.

मनोज तिरोडकर म्हणजे सामान्य पार्श्वभूमीतून उठून, दूरदृष्टी, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय उद्योगविश्वात आपली छाप सोडलेलं नाव!



**प्राथमिक अभ्यासक्रमात तिसरी भाषा म्हणून, हिंदीभाषा सक्तीचा समावेश जरी, राज्य शासनाने तूर्तास रद्द केला असला तरी, सरकारची ही शासकीय लबाडी असून, “लबाडी अजून थांबलेली नाही, तर लढाई कशी थांबेल?” या घोषणेखाली, ‘शालेय शिक्षण अभ्यास आणि कृती समन्वय समिती’चे आयोजक प्रा. डॉ. दीपक पवार यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. ७ जुलै-२०२५ रोजी, मुंबईच्या आझाद मैदानात एकदिवसीय धरणे आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनाला ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे, पक्षाचे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, काँग्रेसचे रोजगार विभाग प्रदेश संयोजक श्री. धनंजय शिंदे आणि ठाण्यातील मराठीप्रेमी वकील श्री. रशिकांत थोरवे आदी मान्यवरांसह, श्री. अविनाश सावंत, श्री. सुमित कदम, श्री. निलेश सावंत हे ‘धर्मराज्य पक्षा’चे कार्यकर्ते उपस्थित होते.** यावेळी पाचवीपर्यंत कोणतीही तिसरी भाषा नको, डॉ. नरेंद्र जाधव समिती तत्काळ रद्द करण्यात यावी, बालभारतीची शैक्षणिक स्वायत्तता अबाधित ठेवण्यात यावी, शिक्षणमंत्री दादा भुसे आणि SCERT संचालक राहुल रेखावार यांची हकालपट्टी करण्यात यावी, १५ मार्च-२०२४चे नवीन संचमान्यता धोरण रद्द करावे, या मागण्या करण्यात आल्या. याप्रसंगी प्रा. डॉ. दीपक पवार आणि मा. राजन राजे यांच्यात महाराष्ट्रात शिक्षणाचे ‘मराठीकारण’ व मराठी भाषेच्या संरक्षण-संवर्धन चळवळीसंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली.

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**